| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २२५ वा | बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याच्या दागिण्याची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रामेश्वर हणमंत गव्हाणे, वय ४२ वर्षे, रा. पाटोदा ता. जि. धाराशिव ह.मु. बरमगाव खु शिवार ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि. १४.११.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील साडे सात ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ३२,२८९ किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रामेश्वर गव्हाणे यांनी दि.१७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(३),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वायर, फवारा, दोन कटरची अज्ञाताने केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अनंता बाबुराव जाधवर, वय ५१ वर्षे, रा.भोगजी ता. कळंब जि. धाराशिव यांचे भोगजी शिवारातील शेत गट नं७५ मधील गोठ्यावरील ५०० फुट वायर, १६ लि एसटीबी फवारा, दोन कटर सा एकुण १०,००० किंमतीचा माल हा दि.१३.११.२०२५ रोजी २१.०० वा. सु.ते दि.१४.११.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अनंता जाधवर यांनी दि.१७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### एक शेळी, सात बोकड व इतर साहीत्याची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-प्रंशात नरसिंग राठोड, वय २५ वर्षे, रा. मुळज ता. उमरगा जि. धाराशिव यांचे मुळज येथील पत्र्याचे शेडचा मागचा पत्रा अज्ञात व्यक्तीने कापुन शेडमधील एक शेळी, सात बोकड व इतर साहीत्य असा एकुण ९८,००० किंमतीचा माल दि. १६.११.२०२५ रोजी ११.०० ते दि. १७.११.२०२५ रोजी ०३.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रंशात राठोड यांनी दि.१७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४(१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस आडथळा: गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सचिन रा. एकोंडी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१७.११.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील ऑटो रिक्षा क्र एमएच १२ यु ३०४० हा पोलीस ठाणे उमरगा समोर मेन रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये उमरगा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

# विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक संशोधन करणे गरजेचे-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव (जिमाका) -विद्यार्थीदशेतूनच विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून सर्व गोष्टींचा अभ्यास करावा. त्या आयुष्यभर लक्षात राहतात.फक्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनीच संशोधन करावे असे नसून,सार्वजनिक व वैयक्तिक जीवनातील दैनंदिन घटना वैज्ञानिक दृष्टीने पाहून त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

१७ नोव्हेंबर रोजी लोहारा तालुक्यातील हराळी येथील ज्ञान प्रबोधिनी विद्यालयात २०२३-२४ व २०२४-२५ या दोन वर्षांसाठी आयोजित इन्स्पायर अवार्ड प्रदर्शनाच्या उद्धाटनप्रसंगी श्री.पुजार बोलत होते.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके, गुजरात येथील इनोव्हेशनच्या परीक्षक शिवानी सिंग,उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे,उमरगा गटविकास अधिकारी राजपूत,लोहाराचे शिवकुमार बिराजदार,शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी,लातूर येथील बी.के.हाश्मी, श्री.राऊत,श्री.देवगुडे,ज्ञान प्रबोधिनीच्या गौरी कापरे,परीक्षक डॉ.प्रवीण काळे आदी मान्यवर यांची मंचावर प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, पूर्वी प्रयोग करण्यासाठी किंवा मनातील कल्पनांना वैज्ञानिक रूप देण्यासाठी शालेयस्तरावर कोणत्याही सोयी उपलब्ध नव्हत्या.मात्र आज जिल्हा परिषदेच्या प्राथमिक ते माध्यमिक शाळांपर्यंत ग्रामीण व शहरी भागात प्रयोग व अभ्यासासाठी सर्व सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. बदलत्या काळानुसार दैनंदिन जीवनातील साहित्याचा वापर करून प्रयोग करता येतात.मनातील कल्पनांना वास्तवात उतरविणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.पुजार पुढे म्हणाले की,सी.व्ही.रमण, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यासारख्या महान शास्त्रज्ञांनी कल्पनाशक्तीवर भर दिल्यामुळेच ते वैज्ञानिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करू शकले. त्यामुळे दैनंदिन जीवनात समोर येणाऱ्या नाविन्यपूर्ण गोष्टींच्या पाठीमागील कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे.हे असे का झाले असे का होते असा प्रश्न वारंवार स्वतःला विचारावा,असे त्यांनी सांगितले.

कला,वाणिज्य व विज्ञान - सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी चिकित्सक व जिज्ञासू वृत्ती ठेवून संशोधनाचा प्रयत्न करावा,असे आवाहन श्री.पुजार यांनी केले.लहान वयातील अनुभव कायम स्मरणात राहतात व प्रेरणादायी असतात,असेही ते म्हणाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष म्हणाले की,मी स्वतः विज्ञानाचा विद्यार्थी असूनही अशा प्रदर्शनात सहभागी झालो नाही याची खंत आहे.संशोधन हे फक्त विज्ञान शाखेतच होत नाही,तर कोणत्याही शाखेतील विद्यार्थी चिकित्सक दृष्टीकोनातून संशोधन करू शकतात. संशोधन हे केवळ नोकरी किंवा पुरस्कारासाठी नसून जीवनासाठी प्रेरणादायी आहे.एखाद्या विषयात संशोधन करायचे असल्यास ते आत्मकेंद्रित करून त्यासाठी झटावे,असे त्यांनी सांगितले.

शिक्षणाधिकारी श्रीमती साळुंके म्हणाल्या की,विज्ञान हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक आहे.विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी ओढ निर्माण करण्यासाठी अशा प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येते. सन २०१० पासून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन होत असून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी शासनामार्फत १० हजार रुपये अनुदान दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.स्वतः च्या कल्पनांना प्रत्यक्षात उतरविलेला प्रयोग म्हणजे 'विज्ञान' असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते फित कापून प्रदर्शनाचे उद्धाटन करण्यात आले. थोर शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागतगीत व विज्ञानगीत सादर केले. प्रास्ताविक शिक्षणाधिकारी श्रीमती.साळुंके यांनी केले.सूत्रसंचालन सतीश कानडे यांनी केले.आभार जिल्हा विज्ञान मंडळाचे अध्यक्ष श्री.स्वामी यांनी मानले.यावेळी धाराशिव,लातूर व नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१९९ विविध विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन या प्रदर्शनात 'वॉटर ट्रस्ट कलेक्टर','ट्रॅफिक वाइज कंट्रोलर','फायर फायटिंग रोबोट', रस्त्यावरील वाहनांचे वजन मोजणे', 'वृद्ध-अंध-अपंगांचा जीवनसाथी','लेझर सिक्युरिटी','हाऊस फोनचा आवाज वाढविणे','आंधळ्याची काठी', 'आधुनिक कांदा शीतगृह','रेल्वे ट्रॅक ओळख सूचना प्रणाली','हाताने पेपर तयार करणे','छातीचा कॅन्सर टाळण्यासाठी सेन्सर','रेल्वे इंटरलॉकिंग सिस्टीम व अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था','ट्रॅफिक कमी करण्यासाठी चौथा दिवा','प्लास्टोस्कोप','स्मार्ट कुकर','स्मार्ट ड्रेनेज अँड वेस्ट मॅनेजमेंट' आदींसह १९९ विविध प्रयोगांचे मॉडेल सादर करण्यात आले.प्रदर्शनात धाराशिव,लातूर व नांदेड जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण व मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे.

# कुष्ठरोगमुक्त धाराशिवसाठी सहकार्य करा-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव-(जिमाका) जिल्ह्यात (एलसीडीसी) कुष्ठरोग शोध मोहीम १७ नोव्हेंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी या मोहिमेत स्वेच्छेने तपासणी करून घ्यावी आणि कुष्ठरोगमुक्त जिल्हा निर्माण करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

कुष्ठरोग शोध मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक आज १७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली.या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,सहाय्यक संचालक ( कुष्ठरोग) डॉ.मारोती कोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत बनसोडे तसेच जिल्हास्तरीय समन्वय समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नुकतेच कुष्ठरोगाला 'नोटिफायबल डिसीज' घोषित केले आहे.यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे सर्व डॉक्टर व आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना, जिल्हाधिकाऱ्यांना आणि गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यातील या मोहिमेत जास्तीत जास्त रुग्णांचे निदान व्हावे आणि सर्व यंत्रणा समन्वयातून काम करून ही मोहीम प्रभावीपणे राबवावी,असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनीही या अभियानाचा सखोल आढावा घेतला असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अभियान यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना पत्राद्वारे दिल्या आहेत. राज्यातील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत, प्रभावी आणि सर्व सरकारी आरोग्य संस्थांमार्फत उपलब्ध आहेत,अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरीदास यांनी दिली.

कुष्ठरोगाविषयी समाजातील गैरसमज आणि भीती दूर करणे हे या मोहिमेचे महत्त्वाचे अंग आहे.यासाठी जिल्हा माहिती कार्यालय,स्थानिक स्वराज्य संस्था,स्वयंसेवी संस्था आणि समुदाय संघटनांच्या सहकार्याने ध्वनिप्रसार,रॅली,पोस्टर्स, पथनाट्य,सामाजिक माध्यमांवरील संदेश, शाळा महाविद्यालयांतील जनजागृती यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

कुष्ठरोगाची महत्त्वाची लक्षणे : त्वचेवर बधिर किंवा संवेदनशून्य चट्टे,हातपाय सुन्न होणे किंवा बधिरपणा,त्वचेवर गाठी/उठाव,स्नायूंचा कमकुवतपणा, हातपायातील विकृती अशी कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील १२०२ पथकांमार्फत एकूण ३ लाख ९ हजार ५०० घरांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी मोहिमेत सहकार्य करावे आणि घराघरात येणाऱ्या पथकांकडून कुष्ठरोग तपासणी करून घ्यावी,असे आवाहन सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.मारोती कोरे यांनी केले.

# महाडिबीटीवरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज ३१ नोव्हेंबरपूर्वी निकाली काढा: सहाय्यक संचालकांचे प्राचार्यांना आवाहन

धाराशिव-(जिमाका) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत व्हीजेएनटी,ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या निर्वाह भत्ता इत्यादी योजनांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज तात्काळ भरून http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत.

सन २०२४-२५ करिता बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरले आहेत,परंतु हे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अद्याप अर्जांची पडताळणी करून सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत.त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी सन २०२४-२५ चे महाविद्यालय लॉगिनवर प्रलंबित असलेले व्हिजेएनटी,ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे पात्र अर्ज तत्काळ पडताळून या कार्यालयाकडे सादर करावेत.

अर्ज सादर करताना शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) व गुणपत्रक यांची मूळ प्रत (ORIGINAL) असणे आवश्यक आहे.ज्या अर्जांत त्रुटी असतील,ते अर्ज त्रुटीपुर्ती करूनच मंजुरीसाठी सादर करावेत. आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच,ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले नाहीत त्यांना महाविद्यालयातून तात्काळ अर्ज भरण्याची सूचना करावी,असे आवाहन पूर्वी करण्यात आले होते. तथापि,सद्यस्थितीत जिल्ह्यात महाविद्यालयस्तरावर आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील २२१ अर्ज, आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील ७५३ अर्ज,आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील १७०० अर्ज असे एकूण मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित आहेत. तसेच,आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ८३० अर्ज,आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील २२४५ अर्ज असे एकूण ३२१९ अर्ज दुसऱ्या हप्त्यासाठी (2nd Installment) महाविद्यालयस्तरावर प्रलंबित आहेत.

महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले सर्व अर्ज दि.३१ नोव्हेंबर २०२५ अखेर निकाली काढावेत. आपल्या लॉगिनवर कोणताही अर्ज प्रलंबित राहणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांचे अर्ज दि.१ डिसेंबर २०२५ नंतर कार्यालयाकडून मंजूर करण्यात येणार नाहीत.

महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील,असे आवाहन सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण),धाराशिव यांनी केले आहे.

# दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना व संस्थांनी ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

धाराशिव, (जिमाका-) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी कलम ५१ व ५२ अन्वये संघटना व संस्थांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. संबंधित संघटना व संस्थांनी आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय,पुणे यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ज्या संस्थांना दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाचे आहे त्यांनी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत दिव्यांग कल्याण विभागाकडे प्रस्ताव सादर करावेत,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

नोंदणीचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या कार्यालयात सादर करावा.

### ॲल्युमिनीअमची विद्युत तारेची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतदि.०६.१०.२०२५ रोजी ३३ केव्ही सबस्टेशन यसवंडी शिवार येथुन ॲल्युमिनीअमची विद्युत तार अंदाजे ०९६५ कि.मी. लांबीची एकुण २,६१,८५६ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना व संस्थांनी ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

धाराशिव,दि.१७ नोव्हेंबर (जिमाका) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी कलम ५१ व ५२ अन्वये संघटना व संस्थांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. संबंधित संघटना व संस्थांनी आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय,पुणे यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ज्या संस्थांना दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाचे आहे त्यांनी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत दिव्यांग कल्याण विभागाकडे प्रस्ताव सादर करावेत,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे. नोंदणीचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या कार्यालयात सादर करावा.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पंतप्रधानांचे सुचक व महत्त्वपुर्ण वक्तव्य

भारत हा देश ज्ञानपीठ होते. ज्ञानाची खाण होती. भारतीय सनातन वैदिक वेदाचे भांडार होते. आजही जे शोध लावले जात आहेत ते वेदाभ्यासच्या जोरवर लावले जात आहेत. जगात सर्वाधिक भारतीय संस्कृती श्रेष्ट आहे हे मानावाचे लागेल. बिहारमध्ये गया, काशी असे अनेक ज्ञानपीठ केंद्र होते ते नष्ट केले. मोगलाने गया येथील पाणी तापविण्यासाठी ज्ञानभांडार नष्ट केली. ज्ञानी भारतीय होते हा इतिहास साक्ष देतो. जगात गुरुकुलीय पद्धत सर्वश्रेष्ठ देशाभिमानी असताना भारत जगात सर्वश्रेष्ठ समजला जाणारा देश होईल या भितीने ब्रिटीशांनी भारतीय सर्व प्राचीन बाबी नष्ट केल्या. सर्व भाषेची जणनी संस्कृत भाषा नष्ट केली. ब्रिटीशांनी ओळखले भारताला दारिद्र्यात ठेवणारे ज्ञान पाजळले पाहिजे. त्यांनी जी आखणी केली तीची आठवण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा करून दिली आहे. प्रसंग होता स्मृतिदिनाचा! ते काय म्हणतात, 'ब्रिटिश खासदार थॉमस बॅबिंगटन मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीने भारतीयांमध्ये ब्रिटिश वसाहतवादी गुलामीची मानसिकता खोलवर रुजवली. हीच मानसिकता स्वातंत्र्यानंतरही आजतागायत कायम राहिली आहे. मेकॉलेच्या या गुलामगिरी मानसिकतेला पुढील दहा वर्षांत समूळ नष्ट करा,' असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले. ते एक्स्प्रेस समूहाचे संस्थापक रामनाथ गोएंका यांच्या स्मरणार्थ आयोजित केल्या जाणाऱ्या स्मृती व्याखानाच्या सहाव्या पर्वात पंतप्रधान मोदी यांनी संबोधित केले. भारताची विकासगाथा, बिहारच्या निवडणुकीच्या निकालाचे गमक, काँग्रेसने आणलेला कथित मुस्लीमलिगी माओवादी विचार, शहरी नक्षलवाद विचारांमुळे सुरू असलेली देशविरोधी आंदोलने आदीवर पंतप्रधानांनी भाष्य केले. मात्र, भारतीय शिक्षणव्यवस्थेत रुजलेल्या आणि पुढे समाजाच्या मानसिकतेचा भाग बनलेल्या ब्रिटिश विचारप्रणालीवर त्यांनी हल्लाबोल केला. ते म्हणाले, 'मेकॉलेने भारतीयांची मने ब्रिटिश केली. त्याने प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था पूर्णपणे नष्ट केली. ब्रिटिश भाषा आणि विचार भारतात रूढ केले. त्याचा परिणाम असा झाला की हजारो वर्षांचे भारतीय ज्ञान, विज्ञान, कला, संस्कृती, परंपरा, जीवनशैलीही नष्ट होत गेली. भारतीय लोक ब्रिटिश सांगतील तसे जगायला लागले. त्यामुळे आपले काय याचाच आपल्याला विसर पडला. आपली संस्कृती, परंपरा, शिक्षण यांचा गौरव करण्याचे सोडून आपण त्याकडे तुच्छतेने पाहू लागलो. आयात विचार, आयात वस्तू, आयात सुविधा आणि आयात प्रारूपांवर जगू लागलो. दुसऱ्याच्या संकल्पना आपल्याला श्रेष्ठ वाटू लागल्या. स्वदेशीला नाकारण्याची ही वृत्ती स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली. ही गुलामगिरीची प्रक्रिया मेकॉलेने १८३५ मध्ये सुरू केली होती. त्याला २०३५ मध्ये २०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे पुढील दहा वर्षांत आपल्याला या मानसिकतेपासून मुक्ती मिळवायची आहे.' मानसिक गुलामगिरीचाच धागा पुढे नेत मोदी म्हणाले की, मेकॉलेच्या गुलामगिरीच्या प्रवृत्तीने पर्यटनासारख्या क्षेत्राचेही मोठे नुकसान केले आहे. आपणच आपल्या संस्कृतीबद्दल अभिमान बाळगला नाही तर दुसरे कसे बाळगतील. इतर देशांमध्ये तिथले लोक स्वतःची परंपरा, संस्कृती जपतात, भारतात मात्र उलटेच घडलेले आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विकासच होऊ शकला नाही! ही गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा भाग म्हणूनच आमच्या सरकारने स्थानिक भाषांना महत्त्व दिले. आम्ही इंग्रजी विरोधात नाही पण, भारतातील प्रादेशिक भाषांना प्राधान्य दिले तरच आपली संस्कृती टिकेल. म्हणूनच मोदी सरकारने नवे शिक्षण धोरण आणले. त्यामध्ये स्थानिक भाषांना महत्त्व दिले आहे. स्थानिक भाषांमध्ये मुलांना शिक्षण घेता येईल. जो पर्यंत मेकाले शिक्षण पद्धती नष्ट करणार नाही तो पर्यंत राष्ट्रप्रेम वाढणार नाही. आतंगवादी कारवायास तोंड द्यावे लागणार आहे. मुळात चुकीची राष्ट्रीयत्त्वाची उभारणी झाल्याने मोठी किंमत मोजावी लागली आहे. मेकाले यांने ओळखले की, येथे तर संस्कृतज्ञानी, गुरुकुलीय शिक्षण पद्धती सर्वश्रेष्ठ आहे. येथे तर सर्व प्रकारचे ज्ञान दिले जाते. येथे विद्यार्थी हा वैद्यकिय क्षेत्राबरोबर राष्ट्र संरक्षणाचे धडे गिरवित आहे. सर्व प्रकारे लढण्याचे ज्ञान संपादन करीत आहे. अशा स्थितीत आपला टिकाव लागणार नाही त्यामुळे त्यांनी भारतीय शिक्षणपद्धती बंद केली. ब्रिटीश पद्धती बरोबर त्यांनी भारत अधोगतीस कसा जाईल, वाईट कसे होईल याचा विचार केला. भारतीयांनी ओळखले पाहिजे की, मेकाले शिक्षणपद्धतीने किती नुकसान झाले. किती वाईट परिणाम झाला. या देशात प्रभुरामचंद्र व योगीराज श्रीकृष्ण व पितामह भीष्मसारखे योद्धे, बलवान हनुमान पैदा होत राहीले तर आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून त्यांनी जी चाल खेळली त्यात ते यशस्वी झाले. त्यामुळे आज जे पंतप्रधान नरेंद्र मोदी जे गोयंका यांच्या कार्यक्रमात वक्तव्य केले ते विचार करायाला लावणारे आहेत. आज माय-प्रेम कमी होत आहे. कुटुंब वाया जात आहे. श्रावण बाळ दिसून येत नाहीत. अज्ञाधारक राम व लक्ष्मणाचा अभाव जाणवत आहे. वाईटचा नाश करणारे योगीराज श्रीकृष्ण घडत नाहीत. असे किती तरी उदा. देता येतील. अगोदरच महाभारताच्या युद्धात ज्ञान मंडळी मारली गेली. महाभारताच्या काळखंडानंतर विचार केला तर ज्ञानी, अभ्यासू व मोठी मंडळीचा अभाव निर्माण झाला. त्यानंतर मेकाले यांनी धुर्त व कपटी धोरण भारतीयांना स्विकाराला भाग पाडले. मुळात गया, नालंदा, काशी आदि ज्ञानपिठ होते. भारतीयांची सर्वोकृष्ठ शिक्षण प्रणाली होती. त्याना नाश मेकाले यांने केला. ही बाब समजून घेणे अपेक्षित आहे. भारतीय युद्धशिक्षण प्रणाली. भारतीय आयुर्वेद शास्त्र जगात उत्तम आहे याचा अभ्यास आता जग करीत आहे. त्यामुळे भारतीय संस्कृती लोप पावावी अशी मेकालेची ईच्छा होती. त्यानुसार त्यांनी खेळलेली चाल यशस्वी झाली. आता शिक्षणात अमुल्य बदलाची गरज असून ती आता यापुढे करण्याचा संकल्प केला आहे. त्याला देशातील जनतेनी साथ दिली पाहिजे. मेकाले शिक्षणपद्धतीला लाथ मारून आपली प्राचीन सर्वश्रेष्ठ असणारी शिक्षण पद्धतीचा आवलंब करावा. जो बदल केला आहे त्याला साथ दिली पाहिजे. नवीन शिक्षण पद्धती ही एक देशात परिवर्तन घडविणारी आहे.

# धर्मवीर देशीकेंद्र महाराजांच्या संकल्पनेत शिक्षण संस्थेची वाटचाल व्हावी याकरिता संचालक मंडळाची समाधी स्थळावर प्रार्थना



**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सन्माननीय संचालक मंडळांनी धर्मवीर देशीकेंद्र महाराजांच्या संकल्पनेत महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेची वाटचाल व्हावी याकरिता त्यांच्या समाधी स्थळावर प्रार्थना केली.

यावेळी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

धर्मवीर देशीकेंद्र महाराज यांच्या समाधीला अभिवादन केल्यानंतर महात्मा बसवेश्वर महाविद्यालयासमोरील जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या सिंहासनारूढ पुतळ्याला सर्व संचालक मंडळांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दि. ०२ मे २०२४ रोजी झालेल्या निवडणूकीवर मा. धर्मादाय आयुक्त यांनी बदल अर्ज क्रमांक ३५०/२५ हा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आजपर्यंतच्या संस्थेमधील वादावर पडदा टाकून मा. सह-धर्मदाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक पार पाडली होती. त्यात नूतन कार्यकारी मंडळ निवडून आले होते. त्यानुसार शिक्षण संस्थेच्या अध्यक्षस्थानी आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बसवराज येरटे, काशिनाथ साखरे, ललिताबाई पांढरे, राजेश्वर पाटील, बाबुराव तरगुडे, गुरुलिंग धाराशिवे, महेश हालगे यांची निवड करण्यात आली होती.

निवडणुकीनंतर सहधर्मदाय आयुक्तांनी प्रस्तुत संचालक मंडळांना प्रोव्हिजनल मंजुरी दिली

होती, ती कायम व्हावी. याकरिता मा. सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी बदल अर्ज दाखल केला होता. त्यावर मा. दोन्हीही पार्टीच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकून तब्बल दीड वर्षानंतर बदल अर्जास दि. १७/११/२०२५ रोजी मंजुरी देऊन कार्यकारी संचालक मंडळास २०२४ ते २०२९ या कालावधीमध्ये कार्य करण्यास मान्यता दिली त्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, आणि कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांचा महाविद्यालयातर्फे फेटा, शाल आणि पुष्पहार घालून यथोचित सत्कार करण्यात आला.

या न्यायालयीन प्रक्रियेत संस्थेच्यावतीने ॲड. प्रशांत शिंदे यांनी कामकाज पाहिले.

# आजचे बालक उद्याचे भविष्य घडवतील

## जिव्हाळा ग्रुपच्या वतीने नेहरू जयंती साजरी, बनशेळकीकर यांचे प्रतिपादन

**उदगीर/प्रतिनिधी :** आजचे बालक हे उद्याचे भविष्य घडवतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक रमाकांत बनशेळकीकर यांनी केले. ते जिव्हाळा ग्रुप उदगीरच्या वतीने आधुनिक भारताचे शिल्पकार देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वनाथराव बिरादार माळेवाडीकर यांनी भूषविले. बनशेळकीकर पुढे म्हणाले की भारताच्या स्वातंत्र्याचे उद्गाते व थोर स्वातंत्र्य सेनानी पंडित जवाहरलाल नेहरु यानी स्वतंत्र भारताचे भव्य दिव्य स्वप्न साकार करण्यात महत्वाची कामगिरी बजावली. भारत देश लोकशाही,धर्म निरपेक्ष व समाजवादी विचारांवर ठाम विश्वास ठेऊन या देशाची मजबूत पायाभरणी केली.तसेच त्यांचा वैज्ञानिक, औद्योगिक व कृषी क्षेत्रासाठी



मोलाचे कार्य केले.त्यांनी आराम हराम है. हा नारा दिला. भाक्रा नानंगल हे आशिया खंडातील सर्वात उंच धरण बांधून कृषी क्षेत्राला फार मोठी देणगी प्रदान केली आहे. याप्रसंगी देविदासराव नादरगे व जिव्हाळा ग्रुप चे उपाध्यक्ष अशोकराव बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात विश्वनाथराव बिरादार यांनी नेहरूजीनी आधुनिक भारताचा मजबुत पाया रचला त्यामुळे देशाची पुढे वेगाने प्रगती झाली असे प्रतिपादन केले.जिव्हाळा ग्रुपचे समन्वयक प्रा डॉ अनिल भिकाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. चंद्रकांत रोडगे यानी आभार मानले.

# तलवारबाजीत १८ सुवर्ण, २ रौप्य, ११ कांस्य: लातूरच्या वैभवी, साईप्रसाद, जान्हवी, रोहिणी, माही, स्मिता यांची स्पर्धेसाठी निवड



**अहमदपूर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर येथे क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, क्रीडा परिषद व क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत लातूरच्या खेळाडूंनी सर्वांचे लक्ष वेधून घेत ऐतिहासिक कामगिरी केली. तब्बल १८ सुवर्ण, २ रौप्य आणि ११ कास्यपदकांची कमाई करत लातूरने राज्यस्तरावर आपले वर्चस्व कायम राखले.

वैभवी माने, साईप्रसाद जंगवाड, जान्हवी जाधव, रोहिणी पाटील, माही कुलकर्णी व स्मिता गुट्टे यांची राष्ट्रीय शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात वैभवी मानेने ईप्पी प्रकारात वैयक्तिक तसेच सांघिक सुवर्ण पटकावत दुहेरी मुकुट जिंकला. तिच्यासह दिव्यांका कदम, अदिती चवळे यांनीही सांघिक सुवर्णाची कमाई केली. फॉइल प्रकारात वैभवी माने, नंदश्री लहराळे व सिद्धी कदम यांनी कास्यपदक मिळवले. मुलांच्या गटात हर्षवर्धन सोमवंशी व श्रेयश गरड यांनी ईप्पी सांघिक सुवर्ण मिळवले, तर करण गलाले फॉइल सांघिक रौप्यपदकाचा मानकरी ठरला.

१७ वर्षांच्या गटात साईप्रसाद जंगवाड याने ईप्पी वैयक्तिक व सांघिक असे दोन सुवर्ण पटकावले. मुलींच्या गटात जान्हवी जाधवनेही वैयक्तिक व सांघिक सुवर्णाची हॅटट्रिक केली. रोहिणी पाटीलने वैयक्तिक रौप्य आणि सांघिक सुवर्ण मिळवले, तर स्नेहा कश्यप व मयुरी वाघमारे यांनी सांघिक सुवर्णाची कमाई केली. १४ वर्ष वयोगटात वेदांत मानेने ईप्पी सांघिक सुवर्ण मिळवले, तर सेबर प्रकारात वेदांत, आशीर्वाद भंडे, सुदर्शन जकवाड, विराज घोगरे यांनी कास्यपदक जिंकले. मुलींच्या गटात माही कुलकर्णी, स्मिता गुट्टे व भक्ती बिरादार यांनी ईप्पी सांघिक सुवर्ण पटकावले. स्मिता गुट्टेने वैयक्तिक सुवर्ण तर माहीने वैयक्तिक रौप्य जिंकले.

खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ता गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले, आकाश बनसोडे यांनी प्रशिक्षण दिले. गुणवंत खेळाडूंचे माजी राज्यमंत्री बाळासाहेबजी जाधव, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त गणपतराव माने, लातूर तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष अभिजीत मोरे, प्रशांत माने आदींनी अभिनंदन केले आहे.

# हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्ती प्रतिबंध व त्यांचे पुर्नवसन अधिनियम, २०१३

महाराष्ट्र शासनाची 'मॅनहोलकडून मशिन होलकडे' ही योजना केवळ एक शासकीय योजना नसून, ती सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. तंत्रज्ञानाचा आधार घेऊन, पिढ्यानपिढ्या शोषित असलेल्या एका समुदायाला अधिक सुरक्षित, प्रतिष्ठित आणि सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवणे, हे या योजनेचे यश आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्र हे हाताने मैला उचलण्याच्या अमानवी प्रथेपासून मुक्त होणारे आणि आपल्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असलेले राज्य म्हणून ओळखले जाईल.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम, २०१३ हा भारतीय संसदेने संमत केलेला एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि मानवी हक्कांना समर्पित कायदा आहे. अमानवी आणि अत्यंत धोक्याचे असलेले हाताने मैला साफ करण्याचे काम पूर्णपणे थांबवून, या पिढ्यानपिढ्या शोषित असलेल्या समुदायाला प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्याची संधी देणे, हे या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत नमूद केलेली व्यक्तीची प्रतिष्ठा आणि अनुच्छेद २१ मधील 'प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा हक्क' या मूलभूत मूल्यांवर हा अधिनियम आधारित आहे.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्ती प्रतिबंध व त्यांचे पुर्नवसन अधिनियम, २०१३ हा केवळ एक कायदा नाही, तर तो सामाजिक न्यायाचे आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. या कायद्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची आणि त्यांना शतकानुशतके चालत आलेल्या शोषणाच्या चक्रातून बाहेर काढण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या कायद्याच्या कठोर अंमलबजावणीने, भारत खऱ्या अर्थाने समानता आणि बंधुता या संवैधानिक मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलेल.

मॅनहोलकडून मशिनहोलकडे ही महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने हाताने मैला उचलणाऱ्या आणि गटार सफाईच्या कामात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी सुरू केलेली एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनकारी योजना आहे. या योजनेचा मुख्य आधार 'हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्ती प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ असून या कायद्याची कठोर आणि परिणामकारक अंमलबजावणी करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. मानवी श्रम आणि जीवावर बेतणाऱ्या धोकादायक पद्धतींचा वापर थांबवून, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि यांत्रिक साधनांचा वापर करणे, हा या योजनेचा गाभा आहे.

भारतीय संविधानातील 'प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा हक्क' सुनिश्चित करण्यासाठी, हाताने मैला साफ करण्याची अमानवी प्रथा समूळ नष्ट करणे आवश्यक आहे. हाताने गटारे आणि सेप्टिक टँक साफ करताना होणारे अपघात आणि विषारी वायूमुळे होणारे मृत्यू ही एक गंभीर राष्ट्रीय समस्या आहे. 'हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्ती प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३' नुसार, कोणत्याही व्यक्तीला सुरक्षा साधनांशिवाय मॅनहोलमध्ये उतरवणे आणि असुरक्षित परिस्थितीत काम करणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ प्रतिबंध घालून न थांबता, सकारात्मक आणि तांत्रिक उपाययोजना करून या कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि प्रतिष्ठापूर्ण रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी 'मॅनहोलकडून मशिनहोलकडे' या महत्त्वाकांक्षी योजनेची सुरुवात झाली आहे.

भारतातील जातीय विषमतेमुळे निर्माण झालेली आणि दीर्घकाळ टिकून असलेली हाताने मैला उचलण्याची प्रथा ही केवळ अनारोग्यकारक नाही, तर ती सामाजिक अन्याय आणि शोषणाचे सर्वात मोठे प्रतीक आहे. या समस्येवर अधिक व्यापक, कठोर आणि पुनर्वसनावर भर देणारा कायदा करण्याची गरज ओळखली. या गरजेतूनच २०१३ चा हा अधिनियम अस्तित्वात आला. कायदा २०१३ लागू होऊनही, आजही देशाच्या अनेक भागांमध्ये ही प्रथा पूर्णपणे संपुष्टात आलेली नाही.

भारताच्या सामाजिक इतिहासातील सर्वात मोठी आणि अमानवी समस्या म्हणजे हाताने मैला उचलण्याची प्रथा. ही प्रथा केवळ अनारोग्यकारक नाही, तर ती जातीय भेदभावावर आधारित आणि मानवी प्रतिष्ठेचे उल्लंघन करणारी आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार नागरिकांना प्राप्त असलेल्या प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करण्यासाठी, भारत सरकारने हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम, २०१३ हा कठोर कायदा संमत केला. हा अधिनियम १९९३ मध्ये लागू झालेल्या कायद्याची जागा घेतो, कारण १९९३ च्या कायद्यातील त्रुटींमुळे आणि कमकुवत अंमलबजावणीमुळे ही प्रथा पूर्णपणे थांबवता आली नव्हती. २०१३ चा हा अधिनियम केवळ प्रतिबंधात्मक न राहता, या कामात गुंतलेल्या व्यक्तींच्या सर्वांगीण पुनर्वसनावर भर देणारा, अधिक व्यापक आणि दंडात्मक तरतुदी असलेला आहे.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या गटसचिवांच्या अडचणीबाबत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची अध्यक्षतेखाली बैठक

**अहमदपूर/प्रतिनिधी :** विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना त्यांच्या व्यवस्थापन व आस्थापना खर्च भागविण्यासाठी शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची मर्यादा वाढ करून विद्यमान अटी व शर्तीमध्ये काही सुधारणा करण्यासाठी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली असून तसा प्रस्ताव सादर करण्याची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केली.

मंत्रालयात राज्यातील सहकारी संस्थांच्या गटसचिवांच्या अडचणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस अपर निबंधक तथा सहसचिव संतोष पाटील, अपर निबंधक श्री. येगलेवार, गटसचिवांचे अध्यक्ष विश्वनाथ निकम व इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

या संस्थांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्यासंबंधी प्रस्ताव शासनस्तरावर सादर करण्याच्या सूचना सहकार मंत्री श्री पाटील यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यातील कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना आर्थिक बळकटी मिळून त्यांच्या प्रशासकीय, विकासात्मक व सेवा कार्यात अधिक कार्यक्षमता येण्यास मदत होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# फाशीची शिक्षाः राजकीय सुडासाठीच!

मानवतेविरुद्ध गुन्ह्याचा ठपका ठेवूनबांगला देशातील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली.

बेकायदेशीररीत्या सत्ताधीश बनलेल्या महमद युनूस यांच्याकडून तेथे व्यापक कारस्थानाची अंमलबाजवणी सुरू आहे. त्याचा एक भाग या 'निकाला'ने पूर्ण झाला. शेख हसीना यांच्या अवामी लीगचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. हिंसाचाराचा भडका उडाला आहे. युनूस सरकारने दिसताक्षणी गोळीबार करण्याचा आदेश दिला आहे. अमेरिका-पाकिस्तान यांच्या इशार्यावर गेल्या वर्षी नंगानाच घालणार्या विद्यार्थी संघटनांना रोखण्याचा अधिकार शेख हसीना सरकारला बांगलादेशाच्या घटनेने दिला होता. तो बजावणे हा गुन्हा? मग युनुस यांच्या आताच्या गोळीबाराच्या आदेशाचे काय? 'राजकीय सूड उगवण्यासाठीचे हत्यार', एवढेच निकालाचे वर्णन होऊ शकते. अराजक निर्माण करून शेख हसीना यांना पायउतार होण्यास भाग पाडणारे गट आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या परिसरात, 'न्याय द्या, न्याय द्या,' असे ओरडत होते. ती अर्थातच युनुस यांची नेपथ्य रचना!

आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या उद्देशाला, लोकशाही मूल्यास आणि न्याय या शब्दालाच निकालाने हरताळ फासला. अनेकांना झुल्फिकार अली भुत्तो यांच्यावरील खटल्याची आठवण झाली असेल! आताचा बांगलादेश आधीचा पूर्व पाकिस्तान. पाकिस्तान एकसंध असताना तेथील राज्यकर्ते देश निर्मितीचा इतिहास विसरले, भाषेच्या आधारावर बंगाली भाषकांवर दडपशाही झाली. पाकिस्तानी लष्कराने क्रूरतेची परिसीमा गाठली. हजारो बंगाली भाषक महिलांवर अत्याचार झाले.



**शेख हसीना यांच्या संदर्भातील निकाल बांगलादेशाच्या कळसुत्री सरकारचा भारताला इशारा होय. त्यांना सोपविण्याची मागणी होईल. बांगलादेशातील सीआयए एजंट्सचे जाळे, भारताविरुद्ध कारवायांसाठी नवी भूमी, ही पाकिस्तानची भूमिका, अशा आव्हानांना भारताला तोंड द्यावे लागेल.**

हे अत्याचार करणारे नराधम आणि तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानातील त्यांचे साथीदार, सहानुभूतीदार यांना कायद्याने शिक्षा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण आहे. न्यूरेनबर्गप्रमाणे खटले चालवून शेख मुजिबूर रहमान यांच्या कन्येने, शेख हसीना यांनी अनेक नराधमांना शिक्षेपर्यंत पोहोचून पीडितांची वेदना कमी करण्याचा प्रयत्न केला. पित्याप्रमाणे हत्या होऊ शकते, ही भीती कायम असतानाही त्यांनी परिणामांची पर्वा केली नाही. या कार्यासाठी त्या नोबेलच्या खर्या हक्कदार आहेत.

**युनूस यांच्यासाठी फाशीही कमी ठरावी...**

शेख हसीना यांना शिक्षा सुनावता यावी यासाठी युनूस यांनी न्यायाधिकरणाच्या तरतुदी बदलल्या. आता देशाच्या राजकीय सनदेविषयी ते सार्वमत घेणार आहेत. त्यासाठी त्यांनी कायद्याची मोडतोड केली. देशात सत्तारुढ झालेल्या परकीयांच्या या हस्तकाला विरोध करण्याचा विवेक सुदैवाने बांगलादेशात अद्याप शाबूत असून दोन न्यायाधीशांनी सार्वमतासाठी काढल्या गेलेल्या अध्यादेशाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उभे केले. सेंट मार्टिन बंदर देण्यास नकार मिळाल्यावर 'लोकशाही'वादी अमेरिकेने धार्मिक विद्वेषी विद्यार्थी संघटनांच्या मदतीने शेख हसीना यांना हुसकावून लावले. अचानक युनूस यांचा सत्ताधीश म्हणून प्रवेश झाला. त्यानंतर अल्पसंख्याकांचे पद्धतशीर शिरकाण करण्यास सुरुवात झाली. या नरसंहाराबद्दल युनूस आणि त्यांच्या साथीदारांना फाशीची शिक्षा देखील कमी ठरावी! बांगला देशाला पुन्हा 'पूर्व पाकिस्तान' बनविण्याची आणि अमेरिकेसाठी हिंद महासागराचा टापू निर्वेध करण्याची युनूस यांची धडपड आहे. उच्चविद्याविभूषित आणि विद्वान म्हणून वर्णन केली जाणारी व्यक्ती धार्मिक विद्वेषाने किती पछाडलेली असू शकते, लोकशाही व्यवस्थेस ती कसा सुरुंग लावू शकते, याचे युनूस हे बोलके उदाहरण. असीम मुनीरना हाताशी धरून अमेरिकेने पाकिस्तानातही ते साध्य केले.

आज बांगला देशातील स्थिती अस्थिर आहे. शेख हसीना पुन्हा परतू शकतील का, हा देखील प्रश्न आहे; पण बांगला देशातील नागरिकांच्या सुदैवाने ते झाले तर युनूस आणि त्यांच्या साथीदारांची गय केली जाऊ नये, ही अपेक्षा. अवामी लीगला निवडणुका लढविता येऊ नयेत याची तजवीज या महाशयांनी केली. लोकांमध्ये सर्वाधिक पाठबळ असलेल्या पक्षावर बंदी, यांसह अनेक विनोद सीआयए, आयएसआय यांच्या इशार्यावर त्यांच्याकडून होतील. शेख हसीनांविरोधातील निकाल त्यापैकी एक.

# सदाफुलीची पाने चावल्याचे फायदे


सकाळी लसणाच्या २ पाकळ्या खाल्ल्याने प्रचंड फायदे होतात

शरीराला दररोज किती कॅल्शियमची आवश्यकता असते , योग्य वेळ जाणून घ्या

दुधासोबत काय खाऊ नये?

जागतिक मधुमेह दिन का साजरा केला जातो, प्रकार, कारणे आणि उपचार जाणून घ्या

सदाफुलीची पाने चावून खाल्ल्याने हे ७ फायदे मिळतील, जाणून घ्या



विंका ही सदाहरित वनस्पती दिसायला जितकी सुंदर आहे तितकीच ती चमत्कारिक देखील आहे. बहुतेक लोक ती केवळ एक शोभेची वनस्पती मानतात, परंतु आयुर्वेद आणि घरगुती उपचारांमध्ये, सदाहरित पानांचा वापर अनेक गंभीर आजारांशी लढण्यासाठी केला गेला आहे.

विशेष म्हणजे त्याची फुले सुंदर आहेत, परंतु त्याच्या लहान हिरव्या पानांमध्ये अनेक औषधी गुणधर्म देखील लपलेले आहेत, ज्याबद्दल बहुतेक लोकांना अजूनही माहिती नाही. जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी १-२ ताजी पाने चावून खाल्ली तर ते अनेक आरोग्य समस्या टाळू शकते. सदाफुलीची पाने चावून शरीराला कोणते फायदे मिळू शकतात ते जाणून घेऊया.

बियांचे पाणी महिनाभर प्या... हार्ट अटॅकचा धोका नाही, पोट झटक्यात साफ होईल

१. मधुमेह नियंत्रित करण्यास उपयुक्त

सदाफुलीची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी अत्यंत प्रभावी मानली जातात. टाइप २ मधुमेह असलेल्यांसाठी ते एक नैसर्गिक हर्बल उपाय असू शकतात. त्यामध्ये असलेले अल्कलॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्स स्वादुपिंडाच्या बीटा पेशी सक्रिय करतात, ज्यामुळे इन्सुलिन स्राव सुधारतो. सकाळी रिकाम्या पोटी दोन पाने पाण्यासोबत चावल्याने रक्तातील साखरेची पातळी हळूहळू राखण्यास मदत होते, परंतु हे उत्पादन वापरण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.


२. रक्तदाब संतुलित करते

जर तुम्हाला उच्च रक्तदाबाचा त्रास असेल आणि औषधांव्यतिरिक्त नैसर्गिक उपाय करून पहायचे असतील, तर सदाफुलीच्या पानांचे सेवन हा एक चांगला पर्याय असू शकतो. नियमित सेवनाने रक्ताभिसरण सुधारते आणि धमन्यांवर दबाव कमी होतो. यामुळे रक्तदाब हळूहळू सामान्य होतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. हे विशेषतः ३५ वर्षांपेक्षा **(क्रमशः पुढील अंकात)**

# दिवसातून किती वेळा शौच जाणे सामान्य आहे?

आपण सर्वजण सकाळी सर्वात आधी शौचालयात जातो. काही लोक दिवसातून एकदाच जातात, तर काहींना अनेक वेळा जावे लागते. स्वच्छ आतड्यांसंबंधी हालचाल सर्वकाही सोपे करते आणि जडपणाची भावना दूर करते. तुम्ही कधी विचार केला आहे का की दिवसातून किती वेळा सामान्य आहे? लोक सहसा याकडे जास्त लक्ष देत नाहीत, परंतु ही आपल्या आरोग्यासाठी महत्त्वाची माहिती आहे.

आपल्या शरीरात आतड्यांसंबंधी हालचाली (शौच) आणि लघवीसाठी योग्य नियम जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे कारण कोणत्याही मोठ्या किंवा सततच्या समस्या गंभीर आजाराचे लक्षण असू शकतात. म्हणून दिवसातून किती वेळा आवश्यक आहे आणि डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा हे जाणून घेणे महत्वाचे आहे. चला जाणून घेऊया:



एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की निरोगी लोक आठवड्यातून तीन वेळा ते दिवसातून तीन वेळा शौचाला जातात. याचा अर्थ प्रत्येकाचे शरीर वेगळे असते आणि ही तफावत पूर्णपणे सामान्य आहे. जोपर्यंत आतडे सहज साफ होत नाहीत आणि मल खूप कठीण किंवा खूप सैल होत नाहीत, तोपर्यंत काळजी करण्याची गरज नाही. याचा अर्थ असा की जर तुम्ही आठवड्यातून कमीत कमी तीन वेळा आणि दिवसातून तीन वेळेपेक्षा जास्त वेळा शौचास जात नसाल, तर तुमच्या आतड्याच्या सवयी सामान्य मानल्या जातात. सर्वात सामान्य पॅटर्न म्हणजे

चरीरींहळ

कॉंग्रेस डखठ वर रामलीला मैदानात काढणार भव्य रॅली; निवडणूक आयोगावर पुन्हा केले गंभीर आरोप

दररोज १ ते २ वेळा सुमारे ५०-६०% लोकांचा हाच अनुभव असतो.

तसेच दररोज १ वेळा, सर्वात जास्त लोक (सुमारे ३०-४०%) याच श्रेणीत येतात.

आतड्याची सामान्य सवय काय आहे?

बरेच लोक असा विश्वास करतात की दिवसातून एकदा शौचास जाणे आवश्यक आहे, परंतु हे खरे नाही. जर तुम्ही आठवड्यातून तीन वेळा ते दिवसातून तीन वेळा शौचास जात असाल, तर हे देखील सामान्य आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचा दिनक्रम राखणे. जर तुम्हाला अचानक बदल दिसला, जसे तुम्ही दररोज शौचास जात होता आणि आता दर तीन दिवसांनी एकदा शौचास जात आहात, तर तो तुमच्या शरीराकडून काहीतरी चुकीचे असल्याचा संकेत असू शकतो.

## काही गंभीर समस्या तर नाही कसे कळेल?

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की प्रत्येकाची पचनसंस्था वेगवेगळ्या प्रकारे कार्य करते. तुम्ही किती वेळा शौचालयात जाता हे महत्त्वाचे नाही, तर तुमचा नमुना सुसंगत आहे का. जर तुम्हाला अचानक शौचालयात जाण्याची आवश्यकता भासली तर तुम्हाला लक्ष देणे आवश्यक आहे. जर तुम्ही आठवड्यातून तीन वेळापेक्षा कमी वेळा शौचास गेलात आणि मल खूप कठीण किंवा वेदनादायक असेल तर त्याला बद्धकोष्ठता मानले जाते. हे तणाव, निर्जलीकरण, औषधे किंवा प्रवासामुळे देखील होऊ शकते.

या सवयी तुम्हाला सहज शौचास होण्यास मदत करतात

फळे, भाज्या, कडधान्ये आणि धान्ये खाल्ल्याने तुम्हाला सहज शौचास होण्यास मदत होते.

दिवसातून आठ ग्लास पाणी पिण्याची खात्री करा.

दररोज थोडे चालणे किंवा हलका व्यायाम केल्याने तुमचे आतडे सक्रिय राहतात.

ताणतणाव किंवा शौचालयात जाण्याची इच्छा वारंवार पुढे ढकलल्याने देखील समस्या वाढू शकते.

थायरॉईड, मधुमेह किंवा आयबीएस सारख्या आजारांचा देखील परिणाम होतो.

तुम्हाला कधी कळते की समस्या वाढत आहे?

दिवसातून ३ पेक्षा जास्त वेळा पातळ किंवा खूप सैल जाणे (विशेषतः रक्त किंवा चिकट मल असेल तर).

आठवड्यात ३ पेक्षा कमी वेळा शौच होणे.


शौच करताना खूप जोर लावावा लागणे, कठीण/गुट्टे येणे, अपूर्ण वाटणे.जर तुम्ही आठवड्यातून तीन वेळापेक्षा कमी वेळा शौचास गेलात तर पोट फुगणे, वेदना किंवा अपूर्ण मल हालचाल जाणवणे यासह, ही बद्धकोष्ठतेची लक्षणे आहेत. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमचे फायबर आणि पाण्याचे सेवन वाढवावे. नियमित वेळी खा आणि हलका व्यायाम करा. जर तुम्हाला तरीही आराम मिळत नसेल, किंवा तुम्हाला तुमच्या मलमध्ये रक्त, वजन कमी होणे किंवा वेदना होत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

प्रत्येकाचे शरीर वेगळे असते, त्यामुळे आतड्यांच्या हालचालींची योग्य संख्या वेगवेगळी असते. बहुतेक लोक आठवड्यातून तीन वेळा ते दिवसातून तीन वेळा शौच करतात आणि हे सामान्य आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आतड्यांची स्वच्छ सवय राखणे आणि ती टिकवणे.अस्वीकारण: हा लेख सामान्य माहितीवर आधारित आहे. आमचे दैनिक समाचार याची पुष्टी करत नाही.

## डॉक्टर टीप्स

### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ समाविष्ट

याप्रमाणे शरीरातील इतर अवयवांना अन्नातील पोषक घटकांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे पोषक घटकांची आवश्यकता आपल्या मेंदूलाही असते. शरीरातील सर्व प्रमुख क्रिया नियंत्रित करणारा असा हा अवयव असल्याने याचे आरोग्यही महात्वाचे आहे. एखाद्या खाद्यपदार्थाची निवड करताना आपण त्याचे रंग, रूप, सुगंध, आणि अर्थातच चव या गोष्टी



प्रामुख्याने लक्षात घेत असतो. आजकालच्या फिटनेसच्या बाबतीत जास्त जागरूक असलेली मंडळी पदार्थाची निवड करताना त्यामध्ये किती कॅलरीज आहेत याचे ही गणित सातत्याने मांडत असतात. मात्र केवळ चव चांगली नाही किंवा कॅलरीज अधिक आहेत म्हणून आवर्जून टाळल्या जाणाऱ्या पदार्थांपैकी अनेक पदार्थ मेंदूच्या आरोग्याला पूरक असून, बुद्धीवर्धक आहेत. (क्रमशः)




## विनोद

'तसं म्हटलं तर आपली मुलगी लहानच आहे लग्नासाठी! थोडी वाट पाहिली तर एखादा हुशार नि चुणचुणीत तरुण मिळेल तिला.' 'इश्श! आता कशाला वाट पहाता? लहान आहे तंवरच तिचे लग्न करून टाकायचं. तसं म्हटलं तर मी थोडीच वाट पाहिली.'

## संदेश

girna bhi acha h aukat ka pta chalta h.
jab hat uthane apno ka pta chalta h.
sikh rha ho mai insan ko padhne ka honar.
suna h chahery par kitabo se ziyada likha hota hai.

## सुविचार

ते सोपे आहे माझ्या मित्रा: कारण राजकारण हे भौतिकशास्त्रापेक्षा अवघड आहे.

**- अल्बर्ट आइनस्टाइन**




**संस्कृत सुभाषित**

कल्पतरू खाली । फळे येती मागितली
तेथे बैसल्याचा भाव । विचारूनी बोले ठाव ।
द्यावे ते उत्तर । येतो प्रति त्याचा फेर
तुका म्हणजे मनी । आपुल्याच लाभ हानी ।

संस्कृत सुभाषित
खल: कापट्या दोषेन दूरेणैव विसृज्यते । अपाय रांकिमि लौके विषेणाशी विषो यथा ।

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत
४. पराक्रमी
७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य
११. खलाशी
१२. कर्णभूषण
१४. गोष्ट
१५. केविलवाणा
१६. पुसट, धूसर
१७. असत्य
१९. सुगरण पक्ष्याचे घरटे
२२. भांडण
२३. मर्यादा, अंत
२५. वाडवडिलांनी कमावलेले
२६. तल्लीन
२७. मैत्रीण
२८. पार्वती
२९. किल्ला
३०. उलट, प्रतिकूल
३४. धनको
३६. मालिका, हार
३७. हनुमान
३८. समशेर
४०. काकुनी
४२. अफवा
४३. हुलगे
४५. सहाय्य
४६. विविध प्रकारचे
४७. लहान
५०. पाण्याचा नळ
५१. वायू
५३. सभा
५४. कोरडे, वैराण
५५. लेखणी
५७. आवड
५९. पाषाण
६१. दारूचा एक प्रकार
६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे
६४. चिंतन
६६. लक्ष्मी
६७. विषयांध
७२. धूळ, केर
७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात
७७. सत्यवानाची बायको
७९. गुलामी
८०. कमी दर्जाचे
८१. नेमस्त

### उभे शब्द

१. वाळू
२. शिजवलेला भात
३. भूमी
५. हसण्याजोगे, पोरकट
६. रुदन
८. स्त्री
९. धार्मिक काव्याचा एक प्रकार
१०. कथालेखक
१२अ. पाकिट
१५. दिवाळी
१८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय
२०. गोफण, बेचकी
२१. कमावलेले (धन)
२२. घट्ट
२३. आंब्याची एक जात
२४. पंढरीची पायी यात्रा
२६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य
२७. बेचव
२८. एक लोकप्रिय वाङ्मयप्रकार
२९. तृण
३१. कामकुचार, सुस्त
३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट
३३. गगन
३५. जाडसर दळलेला गहू
३६. पीछेहाट
३९. मार्गस्थ
४०. ही साखर गुलकंदात वापरतात
४१. नवरा
४३. कपटी
४४. पक्ष्यांचा समूह
४६. आवाज
४८. मऊ
४९. पूर्वज
५०. अपुरा
५२. कोल्ह्यासारखा पशू
५३. नमस्कार
५६. यथेच्छ
५८. सार्वभौम राजा
६०. चांगले
६३. एकाग्र दृष्टी
६५. भ्रतार
६७. छळ, त्रास
६८. खरेपणा
६९. रानात पसरलेली आग
७०. मत्स्य
७१. कागदकापड कापण्याचे साधन
७२. केव्हा
७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ
७५. रोटीचा एक प्रकार
७६. प्राण नेणारा देव
७८. तांबूल

### आडवे उत्तर

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे ेक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

### उभे उत्तर

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.ेक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ७५.नान ७६.यम ७८.विडा






इटलीतील मिलान येथे होणाऱ्या विश्वचषक युरोपियन पात्रता फेरीत भाग घेताना इटली आणि नॉर्वेचे खेळाडू.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव! २१ वर्षांनंतर पहिल्यांदाच असे घडले

**दिल्ली**–कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या पहिल्या कसोटी सामन्याचा शेवट असा होईल, असा कोणी विचारही केला नसेल. या सामन्याचा निकाल अवघ्या अडीच दिवसात लागला. पुन्हा एकदा भारतीय फलंदाज मायदेशात खेळताना फिरकी गोलंदाजांविरूद्ध संघर्ष करताना दिसून आले. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १२४ धावा करायच्या होत्या. एकापेक्षा एक स्टार फलंदाज असलेल्या भारतीय फलंदाजीक्रमासाठी हे आव्हान फार नव्हतं. पण भारतीय संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ३५ षटकात ९३ धावांवर आटोपला.

### शुभमनला डिस्चार्ज पण त्याच हॉस्पिटलमध्ये रातोरात पोहोचले तीन साऊथ अफ्रिकन खेळाडू

नवी दिल्ली –भारत आणि साऊथ अफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना टीम इंडियाने गमावला. त्यामुळे आता साऊथ अफ्रिका १–० ने मालिकेत आघाडीवर आहे. अशातच आता टीम इंडियासाठी आगामी सामना करो या मरो असणार आहे. पुढील गुवाहाटी येथे होणारा सामना जिंकला तरच टीम इंडियाला मालिकेत लाज राखता येणार आहे. अशातच सर्वांना धक्का देणारी माहिती समोर आली आहे.दक्षिण आफ्रिकेचे

काही प्रमुख क्रिकेटपटू काल रात्री कोलकात्यातील वुड्सलँड्स हॉस्पिटलमध्ये गेले होते, अशी माहिती मिळाली आहे.

### संघातील प्रत्येकजण घाबरून खेळतोय, भारताच्या माजी क्रिकेटरने केला खुलासा

दिल्ली–भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन सामन्यांची टेस्ट सीरिज खेळवली जात असून यातील पहिला सामना हा कोलकाताच्या ईडन गार्डन स्टेडियमवर खेळवला गेला. यात सामन्याच्या तिसऱ्या दिवशी साऊथ आफ्रिकेने टीम इंडियावर ३० धावांनी विजय मिळवला. ज्यामुळे साऊथ आफ्रिकेने सीरिजमध्ये १–० ने आघाडी घेतली आहे. मागील १५ वर्षांनी दक्षिण आफ्रिकेने भारतात प्रथमच टेस्ट सामन्यात विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेकडून मिळालेल्या लाजिरवाण्या पराभवानंतर भारतीय संघाला बरीच टीका सहन करावी लागली. भारताचा माजी क्रिकेटर मोहम्मद कैफने टीम मॅनेजमेंटवर गंभीर आरोप केले आणि संघात भीतीचं आणि असुरक्षिततेचं वातावरण आहे असे म्हटले.

### तू निघून जा कारण की.... धोनी सोबतचे ते संभाषण त्यानंतर जडेजाने सिएसके सोडण्याचा..

मुंबई–आयपीएल २०२६ च्या सीजनसाठी चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकतता निर्माण झाली आहे. १५ नोव्हेंबर पर्यत बीसीसीआयने सर्व फ्रेंचायझींना त्यांच्या रिटेन, रिलीज आणि ट्रेड केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करायला सांगितली होती. सर्व संघांनी शनिवारी दिवसअखेरपर्यंत त्यांच्या खेळाडूंची लिस्ट जाहीर केली.

# टीम इंडियाचे टेन्शन वाढले! आता कर्णधारच संघाबाहेर?



मुंबई –साऊथ आफ्रिकेविरुद्ध चालू असलेल्या टेस्ट मालिकेत भारताने पहिला सामना गमावला आहे. त्यातच दुसऱ्या टेस्टपूर्वी कर्णधार शुभमन गिलच्या फिटनेसवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून, तो या सामन्यातून बाहेर जाण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

पहिल्या टेस्टदरम्यान शुभमन गिल जखमी विशाखापट्टणममध्ये झालेल्या पहिल्या टेस्टमध्ये भारतीय कर्णधार शुभमन गिलला दुखापत झाली होती. यामुळे ते दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी मैदानात उतरलेच नाहीत. टीम मॅनेजमेंटनेही त्यांच्या दुखापतीबाबत तपशील उघड केलेला नाही. दुसरा टेस्ट सामना २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटीत खेळला जाणार आहे. पण गिलची उपलब्धता अद्यापही संशयात आहे. बीसीसीआयने अधिकृतरीत्या काहीही जाहीर केलेलं नसून, लवकरच त्यांचा मेडिकल अपडेट येण्याची अपेक्षा आहे.

गिल बाहेर झाल्यास कर्णधारपद कोणाकडे?

सध्याच्या मालिकेसाठी ऋषभ पंत उपकर्णधार आहे. त्यामुळे शुभमन गिल फिट नसल्यास टीमची धुरा पंतकडे सोपवली जाण्याची शक्यता सर्वाधिक आहे. सामन्यादरम्यान अनेक वेळा दिसून आले आहे की उपकर्णधारालाच कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारी दिली जाते. त्यामुळे पंत भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसू शकतात.

साई सुदर्शन की देवदत्त पडिक्कल?

गिलच्या जागी कोणाला प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट केले जाईल, हा मोठा प्रश्न आहे. पहिल्या टेस्टमध्ये साई सुदर्शनला स्थान मिळालं नव्हतं, तर नंबर तीनवर वॉशिंग्टन सुंदरला संधी देण्यात आली होती. दुसऱ्या सामन्यासाठी निवड करताना टीम मॅनेजमेंट पुढील पर्याय विचारात घेऊ शकते. साई सुदर्शन: सलामीचा भरवशाचा पर्याय देवदत्त पडिक्कल: तांत्रिकदृष्ट्या मजबूत डावखुरा ओपनर

गुवाहाटीची पिच कशी असेल, यावर अंतिम निर्णय अवलंबून असेल. विकेट बॅटिंगसाठी चांगली असल्यास साई सुदर्शन पुढे असतील. पण स्पिन किंवा मुव्हमेंटला मदत करणारी पिच असल्यास पडिक्कलचीही चर्चा होऊ शकते.

टीम इंडिया चिंतेत

पहिल्या सामन्यातील खराब खेळामुळे टीम इंडियावर आधीच टीका होत आहे. त्यात कर्णधाराच्या दुखापतीने संकट आणखी वाढलं आहे. भारतीय संघ दुसऱ्या टेस्टमध्ये 'मस्ट विन' परिस्थितीत उतरणार आहे. त्यामुळे पुढील काही तासांत शुभमन गिलच्या फिटनेस रिपोर्टकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## गुवाहाटी कसोटीपूर्वी भारतावर दबाव; दक्षिण आफ्रिकन खेळाडूंच्या तपासणीने वाढली चर्चा



कोलकाता–भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतला पहिला सामना भारताने गमावला. दक्षिण आफ्रिकेने मालिकेत १ – ० अशी आघाडी घेतली आहे. यामुळे गुवाहाटी येथील कसोटी सामना भारतासाठी मकरो किंवा मरोफ अशा स्वरुपाचा आहे. या पार्श्वभूमीवर कोलकातातील एक वेगळीच घटना चर्चेचा विषय ठरली आहे.

दक्षिण आफ्रिकन खेळाडूंची रात्री वैद्यकीय तपासणी

पहिला कसोटी सामना संपल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघातील काही प्रमुख खेळाडूंनी रात्री उशीरा कोलकातातील वुड्सलँड्स रुग्णालयात तपासणीसाठी हजेरी लावल्याची माहिती समोर आली आहे. अचानक झालेल्या या आरोग्य तपासणीमुळे क्रिकेटविश्वात वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे, याच रुग्णालयात भारतीय फलंदाज शुभमन गिलदेखील दाखल होता आणि काल सकाळी त्याला डिस्चार्ज देण्यात आला.

नियमित तपासणी की इतर कारण ?

भारतीय हवामानात मॅच खेळल्यानंतर किंवा सततच्या प्रवासानंतर खेळाडूंची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते. त्यामुळे हे फक्त रुटीन चेकअप असण्याची शक्यता आहे. मात्र, आफ्रिकन खेळाडू रुग्णालयात का आले होते याचे अधिकृत कारण अद्याप समजलेले नाही. वैद्यकीय तपासणीनंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ गुवाहाटीला रवाना होणार असल्याचे कळते.

भारतीय संघ सध्या ोलकात्यातच सरावात व्यस्त आहे. पुढील सामन्यासाठी पर्यायी संघरचना तपासली जात आहे. शुभमन गिल अद्याप पूर्ण तंदुरुस्त नसल्याने साई सुदर्शन आणि देवदत्त पडीक्कल या दोघांकडे प्रशिक्षक गौतम गंभीर विशेष लक्ष देताना दिसत आहेत. त्यामुळे दुसऱ्या कसोटीत भारत पुन्हा एकदा डावखुऱ्या फलंदाजांच्या संख्येवर भर देणार का, याबाबत उत्सुकता आहे.

## भारताच्या पराभवानंतर दिग्गज भडकला, थेट गंभीरलाच सुनावले

मुंबई–कोलकत्ताच्या ईडन गार्डनच्या मैदानावर आज साऊथ आफ्रिकेने भारताचा अवघ्या ३० धावांनी पराभव केली आहे.या विजयानंतर आता साऊथ आफ्रिकेने २ सामन्यांच्या टेस्ट मालिकेत १–० ने आघाडी घेतली आहे.दरम्यान भारताच्या या पराभवानंतर चाहते प्रचंड निराश आहेत. त्याचसोबत आता भारताच्या दिग्गज खेळाडूंकडून गौतम गंभीरच्या रणनितीवर टीका होत आहे.खरं भारतासमोर अवघ्या १२४ धावांचे आव्हान होते. हे आव्हान सहज पुर्ण करून भारताला हा सामना जिंकता आला असता. पण भारतीय संघ ९३ वर ऑलआऊट हा झाला होता.हा सामना भारत सहज जिंकेल असे वाटत होते. पण टेम्बा बावुमाच्या नेतृत्वात आफ्रिकेने पलटवार करत सामना जिंकला.

## मी हरमनप्रीत कौर...हाणामारीचे आरोप लागलेल्या बांग्लादेशी कॅप्टनचा नवा पंगा!

**भारताच्या कर्णधाराच नाव घेत केली मोठी चूक**



**मुंबई** –बांग्लादेश महिला क्रिकेटमध्ये सध्या मोठं नाट्य सुरू आहे. टीमची कॅप्टन निगार सुल्ताना जोटी यांच्यावर ज्युनियर खेळाडूंना धमकावणे, अपमान करणे आणि मारहाण केल्यासारखे गंभीर आरोप झाले आहेत. हे सर्व आरोप नाकारताना त्यांनी असा कमेंट केला की थेट भारतीय कॅप्टन हरमनप्रीत कौरचं नाव यात ओढलं गेलं, आणि विवाद आणखी पेटला.

जुनियर प्लेयर्सना मारहाण केल्याचा आरोप जाहीरपणे फ ेटाळताना निगारने २०२३ मधील भारत–बांग्लादेश महिला मालिकेतील एका घटनेचा दाखला देत भारतीय कॅप्टन हरमनप्रीत कौर यांना वादात ओढलं. एका ऑनलाईन इंटरव्ह्यूमध्ये निगार सुल्ताना म्हणाली ''मी कोणाला मारहाण का करेन? म्हणजे मी स्टंप्सवर बॅट आपटणारी हरमनप्रीत आहे का? मी असं काही का करीन?'' तिच्या या वक्तव्याने सोशल मीडियावर संताप उसळला. कारण भारतीय महिला टीमची कॅप्टन हरमनप्रीत कौरचे नाव कोणत्याही संदर्भाशिवाय उचलून त्यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका करण्यात आली. त्यांच्या या विधानामुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आहे.

२०२३ मध्ये दोघींमध्ये झाला होता वाद

भारताच्या बांग्लादेश दौऱ्यात एका विवादित एलबीडब्ल्यू निर्णयावरून हरमनप्रीत प्रचंड संतापली होती. तिने स्टंप्सवर बॅट आपटत अंपायरिंगवर नाराजी व्यक्त केली होती. त्या वेळी निगार सुल्ताना आणि भारतीय कॅप्टनमध्ये तीव्र वादावादीही झाली होती. आता निगार सुल्तानाने तेच प्रकरण बाहेर काढून स्वत:चा बचाव करताना हरमनप्रीतचे नाव घेतले, ज्यामुळे बांग्लादेशी कॅप्टनवर टीका वाढली आहे.

जहानारा आलमचा थेट आरोप

बांग्लादेशची अनुभवी वेगवान गोलंदाज जहानारा आलम, जी सध्या टीमबाहेर आहे, तिने नुकतेच दावा केला की, निगार सुल्ताना जुनियर खेळाडूंना धमकावतात तिच्यावर हात उगारणे, शिवीगाळ करणे प्लेयर्स मानसिक दडपणात जहानाराने सांगितले की काही खेळाडूंनी तिला फोन करून ''आम्हाला वाचवा, जोटी आम्हाला मारते'' असेही सांगितले होते. त्यावर निगार सुल्तानाचा प्रतिउत्तर देत बोलली की, ''६–७ वर्षांपासून टीमपासून दूर असलेली खेळाडू आरोप करतेय'' निगारने आरोप पूर्णपणे नाकारत म्हटले की, ''मी अशी व्यक्तीच नाही. जर काही घडत असेल तर टीम मॅनेजमेंट आहे, कोचिंग स्टाफ आहे, ते काही कारवाई करणार नाहीत का? सगळ्या गोष्टींसाठी मी एकटीच जबाबदार आहे असं कसं?'' जुनियर प्लेयर्सना काही त्रास असेल तर त्यांनी थेट मॅनेजमेंटला सांगायला हवं होतं. ऑस्ट्रेलियात असलेल्या जहांआराला का फोन करायचा?''

वाद वाढतोय!

निगार सुल्तानाच्या बोलण्याने बांग्लादेश महिला क्रिकेटमध्ये गोंधळ वाढला आहे, आणि भारतीय फॅन्समध्येही तिच्या विधानामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. हरमनप्रीत कौरचे नाव यात ओढल्याने या प्रकरणाने आंतरराष्ट्रीय रंगही घेतला आहे.



चीनमधील ग्वांगझू येथे ॲथलेटिक्समध्ये पुरुषांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीच्या अंतिम फेरीत भाग घेणारे स्पर्धक.

# यंदाची ३९ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन रविवार दि. ७ डिसेंबर रोजी संपन्न होणार

पुणे–भारताच्या मॅरेथॉनची जननी असलेली आणि पुण्याचे नाव जागतिक क्रीडा नकाशावर नेणारी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन यंदा ३९ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यंदा पुरुष–महिला पूर्ण मॅरेथॉनच्या मार्गात काहीसा बदल करण्यात आला आहे.

३९ वी मॅरेथॉन रविवार दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ३:०० वाजता सुरू होईल. सणस मैदान येथील हॉटेल कल्पना–विश्व चौकातून या ४२.१९५ किलोमीटरच्या पुरुष व महिला पूर्ण मॅरेथॉनला झेंडा दाखवून सुरुवात करण्यात येईल. तसेच पहाटे ३: ३० वाजता पुरुष–महिला (२१.०९५) अर्ध मॅरेथॉन, १० कि.मी.सकाळी ६:३० वाजता, ५ कि.मी. सकाळी ७:०० वाजता आणि सकाळी ७:१५ वाजता व्हील चेअर ३ कि.मी या स्पर्धांना सुरुवात होईल.

पुरुष व महिला पूर्ण मॅरेथॉन यंदा नव्या मार्गाने जाईल. सणस मैदानासमोरील हॉटेल कल्पना–विश्व चौक येथून निघून सणस चौक – बाजीराव रस्ता – नगरकर तालीम – लक्ष्मी रोड – कुलकर्णी पेट्रोल पंप तेथून फिरून शनिवार वाडा – शिवाजी पूल – मनपा भवन – मॉडर्न कॅफे – जंगली महाराज रोड – डेक्कन जिमखाना – संभाजी महाराज पुतळा – खंडूजी बाबा चौक – कर्वे रस्ता – कर्वे पुतळा – डावीकडे वळून इराणी कॅफे – करिश्मा बिल्डींग – म्हात्रे पूल येथे वळून मेहेंदळे गॅरेज – डी पी रोड – जोशी किचन – पंडित फार्म –राजाराम पूल – सिंहगड रोड – डावीकडून नवशा मारुती – पु ल देशपांडे उद्यान – पानमळा – दांडेकर पूल – पर्वती पायथा – महालक्ष्मी चौक – सारसबाग – सणस पुतळा येथून डावीकडे हॉटेल कल्पना–विश्व हा २१.०९५ किमीचा पहिला टप्पा पूर्ण करून तेथूनच दुसरा टप्पा सणस पुतळा – महालक्ष्मी चौक – स्वातंर्त्यवीर सावरकर पुतळ्या समोरून, खंडोबा मंदिराहून दांडेकर चौक तेथून सरळ सिंहगड मार्गे, गणेश मळा, राजाराम पूल संतोष हॉल, गोयल गंगा चौक, धायरी पुलावरून, नांदेड सिटीच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत जाऊन डिस्टेंशन सेंटर येथे सर्कलला गोल वळसा घेऊन परत त्याच मार्गे सणस मैदान येथे परत येईल व ४२.१९५ ची पूर्ण मॅरेथॉन सणस मैदानात पूर्ण होईल. तसेच पुरुष व महिला अर्ध मॅरेथॉन स्पर्धा हॉटेल कल्पना–विश्व चौक येथून निघून सणस पुतळा – बाजीराव रस्ता – नगरकर तालीम – लक्ष्मी रोड – कुलकर्णी पेट्रोल पंप तेथून फिरून शनिवार वाडा – शिवाजी पूल – मनपा भवन – मॉडर्न कॅफे – जंगली महाराज रोड – डेक्कन जिमखाना – संभाजी महाराज पुतळा – खंडूजी बाबा चौक – कर्वे रस्ता – कर्वे पुतळा – डावीकडे वळून इराणी कॅफे – करिश्मा बिल्डींग – म्हात्रे पूल येथे वळून मेहेंदळे गॅरेज – डी पी रोड – जोशी किचन – पंडित फार्म –राजाराम पूल – सिंहगड




रोड – डावीकडून नवशा मारुती – पु ल देशपांडे उद्यान – पानमळा – दांडेकर पूल – पर्वती पायथा – महालक्ष्मी चौक – सारसबाग – सणस पुतळा येथून डावीकडे हॉटेल कल्पना–विश्व या मार्गे एक फेरी पूर्ण करून सणस मैदान येथे २१ किलोमीटरचा टप्पा पार करून स्पर्धा संपेल. याशिवाय १० किलोमीटर हॉटेल कल्पना–विश्व येथून निघून महालक्ष्मी चौक – सावरकर पुतळा – सिंहगड रोडवरील संतोष हॉल समोरून वळसा घालून परत सणस मैदान येथे पूर्ण होईल. ५ किलोमीटर ही त्याच मार्गे गणेश मळा चौकापर्यंत जाऊन वळसा घालून परत सणस मैदान येथे पूर्ण होईल. तसेच पुरुष व महिला व्हीलचेअर ३ किलोमीटर ही दांडेकर पूल चौकातून वळसा घेऊन परत सणस मैदान येथे समाप्त होईल.

या मॅरेथॉन मध्ये १५००० हून अधिक स्पर्धक सहभागी होतील अशी अपेक्षा आहे .यांच्या प्रवेशाची अंतिम तारीख .२८ नोव्हेंबर २०२५ पर्यत ु. ारीरींहेपर्पिपिश.लो येथे प्रवेश अर्ज भरता येऊ शकेल. या स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे ३५ लाख रुपयांची बक्षिसे दिली जातील. पुरुष व महिला मॅरेथॉन व अर्ध मॅरेथॉन गटातील पहिल्या ३ भारतीय क्रमांकांच्या स्पर्धकांना विशेष पारितोषिके देण्यात येतील.

यंदा इथियोपिया, केनिया टांझानिया, मॉरीशस इत्यादी देशातून आत्तापर्यंत ७० हून अधिक स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. याशिवाय सेनादल, रेल्वे, पोलीस, आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट (अडख) बॉम्बे सॅपर्स, एसआरपीएफ, एनडीए,यांच्याही प्रवेशिका येत आहेत. त्याच बरोबर लडाख–कारगिल येथील मॅरेथॉन स्पर्धेतील विजेते व तेथील अन्य धावपटू देखील सहभागी होणार आहेत. या मार्गाची मोजणी ''एम्स'' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या प्रतिनिधींतर्फे शास्त्रीय पद्धतीने करण्यात आली असून ठीक ठिकाणी पोलीस बंदोबस्त, पुण्यातील गणेश मंडळे, चंद्रशेखर आगाशे कॉलेज, सरहद कॉलेज व पुण्यातील इतर कॉलेज व अनेक क्रीडा संस्था, क्लब चे स्वयंसेवक.,उत्तम प्रकाश योजना, डॉक्टर व नर्सेस यांची पथके, ॲम्ब्युलन्स सेवा, मार्गावर पाणी, एनर्जी ड्रिंक, प्रसाधनगृहे, सणस मैदान येथे छोटे हॉस्पिटलची व्यवस्था आदिंची पूर्वतयारी सुरू झाली आहे. डॉक्टर पथकाचे नेतृत्व डॉक्टर राजेंद्र जगताप करत आहेत. यांच्याबरोबर संचेती हॉस्पिटल, नवले हॉस्पिटल ,भारती विद्यापीठ, सिम्बॉयसिस, एमआयटी, अशा संस्थांची डॉक्टर व नर्सेसची पथके सहभागी होत आहेत.

यावर्षी पुणे मॅरेथॉन ची ठींप त्रे एर्पीळीपाशपींरश्र डींपींरळपरलळश्रळीं ह्या थीमला अनुसरून संस्थेतर्फे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या वेळी मॅरेथॉन मार्गावरती जमा होणाऱ्या पाण्याच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्यांचे रिसायकलिंग केले जाणार आहे. कार्बन फुट प्रिंट कमी करण्यासाठी देखील विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

यावर्षी देखील विजेत्यांना देण्यात येणारी गौरव पदके पर्यावरण पूरक बांबींची पूर्तता करणारी असतील. या सोबतच मॅरेथॉन ची माहिती व तयारी या संदर्भातील सविस्तर माहिती देणारा ारीरींहेप ाळपव–ीशीं कार्यक्रम दर आठवड्याला झींपश ळपींशीपरींळेपरश्र ारीरींहेप च्या यूट्यूब वरून प्रसारित केला जाणार आहे. गेली ४ वर्षे नाईट मॅरेथॉन आयोजित करण्यात आली. मात्र मार्गावर रात्री १२ नंतरही जास्त वाहतूक असल्यामुळे मागील वर्षापासून पहाटे ३.०० वा. पूर्ण व त्यानंतर अर्ध मॅरेथॉन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सारसबाग – सिंहगड रस्ता व नांदेड सिटी आणि परत हॉटेल कल्पना–विश्व या मार्गावर पूर्ण मॅरेथॉन साठी दोन फेऱ्या करण्याऐवजी शहराच्या मध्य भागातूनही मॅरेथॉन जावी ही पुणेकरांची मागणी होती त्यामुळे यंदा हा नवा मार्ग आखण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे पुणेकर या स्पर्धेला मोठा प्रतिसाद देतील असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# कृषी मंत्रालयाकडून शेतकऱ्यांना मोठा दिलासा : वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे पिकांचे नुकसान तसेच भातशेतीमध्ये होणारे पाणथळ नुकसानीस विमा संरक्षण

## – नवीन जोखीम कवचामुळे किनारी, हिमालयीन व ईशान्य राज्यांना मोठा फायदा
## – प्रधानमंत्री फसल विमा योजनेत अधिक सर्वसमावेशक व सक्षम करण्यासाठी नवे बदल, खरीप २०२६ पासून अंमलबजावणी

दिल्ली : कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने प्रधानमंत्री फसल विमा योजनेत महत्त्वाचा बदल करत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे पिकांचे नुकसान तसेच भातशेतीमध्ये होणारे पाणथळ नुकसान आता अधिकृतपणे योजना अंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे.

**वन्यप्राणी हल्लास्थानिक जोखीम श्रेणीत पाचवे ॲड–ऑन कव्हर**

सुधारित धोरणानुसार, वन्यप्राण्यांमुळे होणारे पिकांचे नुकसान आता 'स्थानिक धोका' या श्रेणीत पाचव्या 'ॲड–ऑन कव्हर' म्हणून मान्य करण्यात आले आहे. प्रत्येक राज्य वन्य प्राण्यांची यादी जाहीर करणार असून ऐतिहासिक माहितीनुसार संवेदनशील जिल्हे किंवा विमा घटकांची ओळख करणार आहे. शेतकऱ्यांना नुकसानीची नोंद क्रॉप इन्शुरन्स ॲपवरून ७२ तासांच्या आत जिओ–टॅग केलेल्या फोटोसह करावी लागणार आहे.

हे निर्णय अनेक राज्यांकडून करण्यात






आलेल्या जुन्या मागण्यांना प्रतिसाद देणारे असून, अचानक होणाऱ्या स्थानिक स्वरूपातील तीव्र पिक नुकसानीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण अधिक मजबूत करतील. पीएमएफबीवायच्या कार्यकारी मार्गदर्शक तत्त्वांनुसारच हे बदल वैज्ञानिक, पारदर्शक व देशभरात अंमलबजावणीस सोपे अशा स्वरूपात तयार करण्यात आले आहेत. याची अंमलबजावणी खरीप २०२६ पासून होणार आहे.

**शेतकऱ्यांची दीर्घकालीन मागणी पूर्ण**

हत्ती, रानडुक्कर, निलगाय, हरीण, माकडे आदी वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे अनेक वर्षे देशभरातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत होते. जंगल, वन्य मार्ग आणि डोंगराळ भागांच्या शेजारील प्रदेशांमध्ये अशा घटना वारंवार घडतात. यापूर्वी या नुकसानीसाठी विमा संरक्षण नसल्याने अनेक शेतकरी भरपाईपासून वंचित राहत होते.

**भातशेतीतील पाणथळ नुकसान पुन्हा विमा कव्हरमध्ये**

पावसाळ्यात पूर, जोरदार पाऊस आणि नद्या–ओढ्यांच्या पातळीतील वाढ यामुळे किनारी व पुरप्रवण भागांतील भातशेतीत दरवर्षी मोठे नुकसान होते. नैतिक धोका व पडताळणीतील अडचणींमुळे २०१८ मध्ये हे कव्हर काढून टाकण्यात आले होते. मात्र त्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये मोठी सुरक्षा पोकळी निर्माण झाली होती. या वाढत्या जोखमींचा विचार करून कृषी विभागाने एक तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. समितीच्या शिफारशी आता कृषी व शेतकरी कल्याण मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांनी मंजूर केल्या आहेत. यामुळे स्थानिक नुकसानीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना आता तंत्रज्ञानाधारित, वेळेवर दावा सेटलमेंट मिळणार आहे.

**कोणत्या राज्यांना सर्वाधिक फायदा?**

वन्यप्राणी हल्ल्याच्या कव्हरमुळे खालील राज्यांना मोठा दिलासा मिळणार आहे: ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, उत्तराखंड तसेच हिमालयीन व ईशान्य राज्ये आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम व हिमाचल प्रदेश.

भातशेती पाणथळ नुकसान कव्हर पुनश्च लागू केल्याने खालील राज्यांतील शेतकऱ्यांना विशेषत फायदा होईल:

ओडिशा, आसाम, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र व उत्तराखंड.

वन्यप्राणी हल्ला आणि भात पाणथळ कव्हर यांचा समावेश झाल्यामुळे पीएमएफबीवाय आणखी समावेशक, प्रतिसादक्षम व शेतकरीहिताचे होणार असून भारताच्या पिक विमा प्रणालीला अधिक बळकट करण्यास ही मदत होणार आहे.

# रेणा साखर कारखान्याकडून प्रत्यक्ष गाळपास सुरुवात

## – ७.५१ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट
## – ऊसगाळप शेतकऱ्यांना उच्चत्तम बिल अदा करणार

**लातूर/प्रतिनिधी** : राज्यातील सहकारी साखर कारखानदारीत उस उत्पादकांना अधिक भाव देणाऱ्या रेणापूर तालुक्यातील निवाडा दिलीपनगर येथील रेणा सहकारी साखर कारखान्याचा चालु गळीत हंगामास २०२५–२६ चे प्रत्यक्ष गाळपास दि. १७ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष सुरुवात झाली असून यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्रालगतचे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कारखान्याने या हंगामात ७.५१ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवलेले असून कारखान्याने केलेल्या विस्तारीकरणाचा पुरेपुर उपयोग करत गाळपाचे उद्दिष्ट पुर्ण करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक ती तोडणी यंत्रणा उभी केली आहे ऊस तोडणी मध्ये ८० टक्के हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणी केली जात असुन यामुळे रेणापूर व परिसरातील ऊस उत्पादकांचे आनंदाचे वातावरण पसरले आहे

**चालु गाळप हंगामात ऊसाला उच्च भाव देण्याचा प्रयत्न**

राज्याचे माजी मंत्री रेणा साखर कारखान्याचे संस्थापक तथा मांजरा परिवाराचे मार्गदर्शक दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी कारखान्याच्या वार्षीक सर्वसाधारण सभेमध्ये ऊसदरा बाबत जाहीर केल्याप्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उच्चतम ऊस बील अदा केले जाणार आहे रेणा कारखान्याकडे गळीत



हंगाम २०२५–२६ करीता कारखान्याकडे नोंदविलेल्या ऊसाचे गाळप पुर्ण करणेच्या दृष्टीने आवश्यक उपाय योजना करुन वेळेत ऊसाचे गाळप करण्याचा प्रयत्न राहणार आहे. आवश्यक तोडणी यंत्रणा व हार्वेस्टर यंत्रणा कामाला लागली असुन कारखाना गाळप नियमीतपणे सुरु झाला असल्याची देण्यात आली आहे.

## नाशिकच्या मिलिटरी स्कूलमध्ये बिबट्या दिसल्याने धावाधाव, सर्च ऑपरेशनदरम्यान समोर आले वेगळच सत्य

**नाशिक/प्रतिनिधी** : राज्यात सध्या एका गंभीर प्रश्नाने डोकं वर काढलं आहे. पश्चिम महाराष्ट्रासह उत्तर महाराष्ट्रात बिबट्यांच्या वावरामुळं दहशत निर्माण झाली आहे. पुणे, अहिल्यानगरनंतर नाशिकमध्येही बिबट्यांचा नागरी वस्तीत वावर दिसून आला आहे. सोमवारी नाशिकयेथील प्रसिद्ध भोसला मिलिटरी स्कुलच्या आवारात बिबट्या दिसल्याचे सांगण्यात आले होते. शाळेत बिबट्या दिसून आल्याने एकच खळबळ उडाली होती. त्यामुळं मुलांच्या सुरक्षिततेचा उपाय म्हणून शाळेला सुट्टी देण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणात भलताच ट्विस्ट समोर आला आहे.

सोमवारी नाशिकच्या गंगापूर रोड भागात असलेल्या भोसला मिलिटरी शाळेच्या आवारात बिबट्या दिसून आल्याचे सांगितले जात होते. त्यामुळं परिसरात एकच खळबळ उडाली होती. दोन दिवसांपूर्वी याच भागातील काही अंतरावर बिबट्या जेरबंद करण्यात आला होता. त्यामुळं खबरदारीचा उपाय म्हणून शाळेला सुट्टी देण्यात आली होती. मात्र आता तो बिबट्या नसून वेगळाच प्राणी असल्याचे समोर आले आहे. भोसला मिलिटरी शाळेला आजदेखील सुट्टी देण्यात आली होती. तसंच, सोमवारी या परिसरात सर्च ऑपरेशनदेखील राबवण्यात आलं होतं.

# आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद लातूर २५ डिसेंबर २०२५ : धम्मप्रसाराची दिशादर्शक सुरुवात

**लातूर/प्रतिनिधी :** त्रिरत्नांचा संदेश घराघरांत पोहोचवण्यासाठी निरंतर कार्यरत असलेल्या बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर आणि समस्त लातूरकरांच्या सहकार्याने पु. भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शना खाली आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद रामेगाव, बार्शी रोड येथील महाविहार धम्म संस्कार केंद्रात २५ डिसेंबर २०२५ रोजी भव्य स्वरूपात होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून धम्मक्रांती, मानवता, बंधुता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वप्नात पाहिलेले बौद्धमय भारताचे दृश्य अधिक प्रभावीपणे समाजासमोर मांडले जाणार आहे, असे परिषदेचे मुख्य संयोजक पु.भिक्खू पय्यानंद थेरो यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेला भंते बोधिराज, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, केशव कांबळे, डॉ. सुधाकर गुळवे, डी. एस. नरसिंगे, एम. एन. गायकवाड, पांडुरंग अंबुलगेकर, देवदत्त सावंत, प्राचार्य. डॉ. दुश्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, अंतेश्वर थोटे, प्रा. यु. डी. गायकवाड, बसवंतप्पा उबाळे, करण ओव्हाळ, उदय सोनवणे, ॲड. आनंद सोनवणे, प्रा. कल्याण कांबळे, व्ही. आर. बोरीकर, गौतम सूर्यवंशी, मिलिंद धावारे, सुजाता अजनिकर ई. सह मोठ्या संख्येने उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

आठव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन पु. भिक्खू करूणानंद महाथेरो, संघनायक (दिल्ली) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान अ.भा. भिक्खू संघ शाखा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष भिक्खू धम्मसेवक महाथेरो (मूळावा) भूषवणार आहेत. याच प्रसंगी प्रतिष्ठेच्या सातकर्णी स्मरणिकेचे प्रकाशन पु.भिक्खू प्रा. डॉ. खेमधम्मो महाथेरो यांच्या हस्ते होणार आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळची सुरुवात धम्ममय वातावरणात होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सकाळी ०८:०० वाजता पंचरंगी धम्मध्वजारोहणा नंतर उपासक–उपासिकांच्या भव्य उपस्थितीत धम्म मिरवणूक निघणार आहे. अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, बसस्टँड मार्गे जात ही मिरवणूक आंबेडकर पार्क येथे समारोप पावेल. यानंतर सकाळी १०:०० वाजता मुख्य धम्मध्वजारोहण भिक्खू शरणानंद महाथेरो, पाथरी यांच्या हस्ते विधिपूर्वक करण्यात येईल.

या वर्षीच्या परिषदेत देशभरातील तसेच परदेशातील अनेक नामवंत भिक्खू सहभागी होत असून त्यांच्या धम्मदेशनेमुळे ज्ञान, प्रेरणा आणि चिंतनाचा समृद्ध अनुभव मिळणार आहे. यावेळी भिक्खू प्रा. डॉ. सत्यपाल महाथेरो (छ. संभाजीनगर), भिक्खू दयानंद महाथेरो (मूळावा), भिक्खू डॉ. यशकाश्यपायन महाथेरो (जयसिंगपूर), भिक्खू पय्यातीस्स महाथेरो (शिरसाळा), भिक्खू धम्मानंद महाथेरो (अंदूरबिदर) तसेच अनेक वरिष्ठ भिक्खूगणांचा समावेश असेल. हजारो उपासकउपासिका आणि धम्मप्रेमी या परिषदेत सहभागी होणार असल्याने लातूर नगरी पुन्हा एकदा धम्ममय होणार आहे.

लातूर जिल्हा धम्म प्रचारातील अग्रणी केंद्र मानला जातो. तेर (तगर) नगरी, खरोसा लेणी यांसारखी बौद्धकालीन प्राचीन स्थळे या परंपरेचा वारसा जपतात.

पु.भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहिलेले महाविहार धम्म संस्कार केंद्र हे आज राज्यातील धम्म शिक्षणाचे प्रभावी केंद्र आहे. २०१७ पासून आजपर्यंत सात परिषदा यशस्वीरीत्या आयोजित करून लातूरने धम्म प्रचारात एक मोलाची परंपरा निर्माण केली आहे.

सर्व धम्मप्रेमींना पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या वेळी केले आहे. लातूर, मराठवाडा आणि महाराष्ट्रातून हजारो उपासक उपस्थित राहणार आहेत.

हंगामी नियोजन कार्यकारिणीमध्ये मार्गदर्शक : पू. भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो, अध्यक्ष / मुख्य संयोजक : भिक्खू पय्यानंद थेरो, उपाध्यक्ष : डॉ. सदानंद कांबळे, इंजि. सचिन गायकवाड व इतर, सचिव : प्रा. देवदत्त सावंत, कोषाध्यक्ष : डॉ. अरुण कांबळे, स्मरणिका प्रकाशन : प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे, मिलिंद धावारे यांचा समावेश आहे.

लातूरमध्ये होणारी आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून धम्म, बंधुता आणि मानवतावादाच्या नव्या युगाची सुरूवात आहे. धम्माच्या प्रसारासाठी, सामाजिक ऐक्यासाठी आणि आंबेडकरी तत्वज्ञानाच्या पुनर्जीवनासाठी ही परिषद निश्चितच एक मैलाचा दगड ठरेल.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात "रेलवन" ॲप ची जनजागृती मोहीम







**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात "रेलवन" या ॲप च्या संदर्भात मुख्य स्थानकांवर पोस्टर आणि प्रात्यक्षिके दाखवून प्रवाश्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. रेल्वे प्रशासनाने रेलवन हे ॲप काही महिन्यांपूर्वी डेव्हलप करून रेल्वेच्या सेवा पूर्ततेसाठी वापरात आणण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर रेल्वे विभागातील सोलापूर, पंढरपूर, कलबुरगि, लातूर, कुर्डुवाडी या मुख्य स्थानकांवर या ॲप च्या संदर्भात माहिती सांगण्यात येत आहे. तिकीट बुकिंग आणि आरक्षण या दोन्ही काउंटरवर या संदर्भात विस्तृत माहिती प्रकाशित करण्यात आली आहे.

या ॲप मधून आरक्षित तिकीट बुकिंग, आर–वॉलेट वापरून ३% सवलतीसह अनारक्षित यूटीएस तिकिटे, लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग आणि रिअल–टाइम चौकशी, ई–केटरिंगद्वारे फुड ऑर्डर, तक्रार निवारण प्रणाली, प्लॅटफॉर्म तिकिटे, तिकीट रद्द करणे, पीएनआर सेवा आदी सेवांचा फायदा रेल्वे प्रवासी घेऊ शकतात.

सोलापूर विभागातून रेल्वेचा प्रवास करणारे आणि इतर सर्व रेल्वे उपभोक्त्यांनी रेल्वेच्या सेवांचा उपभोग घेण्यासाठी रेलवन सारख्या ॲप डाउनलोड करून एकाच छताखाली असलेल्या सर्व प्रवासी सेवांचा पुरेपूर वापर करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य प्रबंधक श्री योगेश पाटील यांनी केले आहे. प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून रेलवन डाउनलोड करू शकता. शिवाय विद्यमान रेलकनेक्ट/यूटीएस क्रेडेन्शियल्स वापरून लॉगिन करा किंवा नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा.

रेलवन या ॲप ची सोलापूर रेल्वे विभागाच्या डीआरएम सोलापूर या अधिकृत ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम, थ्रेड आणि यु ट्यूब या सोशल मीडिया हँडल वरून संपूर्ण माहिती देण्यात येत आहे. रेल्वे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी सोलापूर रेल्वे विभाग सदैव कटिबद्ध आहे.

## पळशी येथे १९ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर पर्यंत श्री खंडोबा देवस्थानतर्फे सप्ताहाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील पळशी येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्री खंडोबा देवस्थानाच्यावतीने १९ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.



यामध्ये १९ नोव्हेंबर रोजी बुधवारी श्री खंडोबा मंदिरामध्ये घटस्थापना करण्यात येणार आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री खंडोबा देवस्थान सप्ताहनिमित्त सकाळी ०९ ते १२.३० वा ग्रंथ मिरवणूक व दुपारी १२.३० ते ४.३० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. २६ नोव्हेंबर रोजी वाघ्या मुरळी यांच्या भक्तीगितांचा कार्यक्रम व चंपाषष्टीनिमित्त लंगर तोडण्याचा कार्यक्रम होणार आहे व शेवटी तळी भंडार कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहाच्या कालावधीत दररोज सायंकाळी ०७.०० वा श्री मल्हार महात्म्ये या ग्रंथाचे पारायण घेण्यात येईल व दररोज सायं ०७.ते ९.०० या वेळेत श्री खंडोबा देवस्थानचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. यामुळे १९ ते २६ नोव्हेंबर २०२५ या सप्ताहाच्या कालावधीत पळशी गाव व परिसरातील भावी–भक्त व सर्व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री खंडोबा देवस्थान,पळशी यांच्यावतीने करण्यात आलेले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी ९५५२७४७२८२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# घनकचरा व्यवस्थापन कामाची आयुक्त श्रीमती मानसी यांच्याकडून पाहणी

**लातूर/प्रतिनिधी** : शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांनी स्वच्छता विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊन वरवंटी कचरा डेपो येथील कचरा प्रक्रिया केंद्रास भेट दिली. कामकाजाची पाहणी केली.

वरवंटी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या ओला कचरा प्रक्रिया, सुका कचरा प्रक्रिया, बायोगॅस व इतर कामाची पाहणी करुन त्यांनी समाधान व्यक्त केले. पाहणी दरम्यान ओल्या कचऱ्या पासून बायोगॅसद्वारे तयार होणाऱ्या विजेचा वापर व त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना केल्या. दैनंदिन जमा होणाऱ्या ओला व सुका कचऱ्यावर प्रक्रिया होऊन



त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी व त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या.

सदरील पाहणी दरम्यान उपायुक्त वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर,वरवंटी कचरा डेपो प्रमुख आशिष साठे, शहर समन्वयक रोहित पांचाळ व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# धाराशिव मध्ये बदलाच्या वाटेवरील संदेश सौ. संगीता सोमनाथ गुरव नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी जाहीर



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिवच्या मातीशी असलेली नाळ शहरावरील प्रेम आणि लोकांनी दाखवलेला विश्वास हीच माझी ताकद आहे अशा शब्दात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सौ संगीता ताई सोमनाथ गुरव यांनी नागरिकाचे आभार मानले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व काँग्रेस या दोन्ही पक्षाचे नेतृत्व आणि कार्यकर्तेचा विश्वास हा माझ्यासाठी सन्मान असून जबाबदारीची जाणीव देणारा आशीर्वाद असल्याचे त्यांनी सांगितले गल्लीतून मिळालेल्या आपुलकीपासून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यापर्यंत सर्वांचा विश्वास माझ्यासाठी लढाईचे खरे बळ आहे स्वच्छ प्रशासन बदलाची नवी दृष्टी आणि साधारण नागरिकाच्या जगण्यात फरक घडवण्याची वेळ आली आहे धाराशिवच्या हितासाठी जनतेच्या हक्कासाठी प्रामाणिक नेतृत्वाच्या लढाईसाठी माझा प्रत्येक श्वास अर्पण राहील असा निर्धारित त्यांनी व्यक्त केला नागरिकाच्या प्रेमाला आणि पक्षाने दाखवलेला विश्वासाला योग्य उतराई करण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करणार आहे ही लढाई माझी नाही तर धाराशिवच्या भवितव्याचे आहे असे सौ संगीता ताई सोमनाथ गुरव शेवटी असे म्हणाल्या.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे काम सुरळीत; नवीन LOI देण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार

## गैरव्यवहार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

धाराशिव (जिमाका)- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याव्यतिरिक्त इतर सर्व कामकाज सुरळीत सुरू आहे. लाभार्थ्यांना दिला जाणारा व्याज परतावा कोणत्याही अडथळ्याविना नियमितपणे वितरित केला जात असल्याची अधिकृत माहिती महामंडळाने यापूर्वी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सप्टेंबर २०२५ अखेर 'होल्ड' व 'ब्लॉक' केलेली प्रकरणे वगळता व्याज परताव्यासाठी दावा केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात व्याज परताव्याची रक्कम जमा करण्यात आली आहे.

काही माध्यमांमध्ये महामंडळाचे कामकाज बंद असल्याच्या बातम्या प्रसारित झाल्या होत्या.त्या संदर्भात महामंडळाने स्पष्टीकरण देताना सांगितले की,पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्रक्रिया काही तांत्रिक कारणांमुळे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती; मात्र व्याज परतावा व बँक मंजुरी प्रकरणांचे सर्व कामकाज सुरळीत सुरू आहे.

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील काही एजंट व ट्रॅक्टर एजन्सींनी संगनमत करून एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून अनेक प्रकरणे महामंडळाकडे दाखल केली होती.यातील काही व्याज परताव्याचे पैसे संबंधित एजंटांनी स्वतःच्या खात्यात घेतल्याचे निदर्शनास आले आहे.या गंभीर माहितीची दखल घेऊन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विजयसिंह देशमुख यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांना (SP) त्वरित कारवाईसाठी पत्र पाठविले.

यानंतर पोलिस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी तातडीने कारवाई करत तोफखाना पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे संबंधित एजंट व व्यक्तींवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.नाशिक व अहिल्यानगर या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अनियमिततेबाबत गुन्हे दाखल झाले असून,तपास सुरू असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे.राज्यातील इतर जिल्ह्यांतही अशा प्रकारचे गैरव्यवहार घडले आहेत का,याची स्वतंत्र तपासणी सुरू आहे.

नाशिक व अहिल्यानगरसारख्या घटना अन्य ठिकाणी घडू नयेत म्हणून महामंडळाने Account Validation प्रणाली लागू केली आहे.एजंटमार्फत दाखल झालेली संशयास्पद प्रकरणे तात्पुरत्या स्वरूपात "Block' करण्यात आली आहे.ज्या लाभार्थ्यांची प्रकरणे इश्रेलज्ञ आहेत त्यांनी त्यांच्या मूळ कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचे संपर्क क्रमांक www.udyog.mahaswayam.gov.in या प्रणालीवर उपलब्ध आहेत.

यापुढे नागरी सुविधा केंद्र वगळता इतरत्र,एकाच मोबाईल क्रमांक किंवा लॉगिनवरून एकच प्रकरण दाखल करता येईल,अशी सुधारणा महामंडळाने प्रस्तावित केली आहे.

पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्रक्रियेतील तांत्रिक सुधारणा पूर्ण करून शक्य तितक्या लवकर नवीन ङजख देण्याची प्रक्रिया सुरू करणार असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# जिल्ह्यातील शिवारे फुलली; रब्बी ज्वारीची कोळपणी सुरू

धाराशिव (प्रतिनिधी)-जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात पेरणी झालेल्या ज्वारीची आंतरमशागत सुरू आहे. शेतशिवारात बळीराजाकडून कोळपणीची कामे सुरू आहेत. जिल्ह्यात दि. १५ नोव्हेंबरपर्यंत ५२,३०० हेक्टर क्षेत्रावर रब्बी ज्वारीची पेरणी झाली आहे. यात सर्वाधिक तुळजापूर तालुक्यात २८,३५९ हेक्टर म्हणजेच सरासरी क्षेत्राच्या ५७ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यावर्षीच्या दरमदार पावसामुळे जमिनीत चांगली ओल असल्याने ज्वारीचे पीक चांगले दिसत आहे. असे असले तरी वापशाअभावी परेणी न करता आलेल्या शेतात ज्वारीची पेरणी सुरू आहे.

तालुका परेणी क्षेत्र प्रत्यक्ष परेणी टक्केवारी धाराशिव २५,२६८ २६५२ १०.०५ तुळजापूर ४९,०६ २८३५९ ५७.०८ परांडा १८०६ १९२६ १०.६६ भूम २९४६८ ०३७० ३५.१९ कळंब ७९५२ २२२४ २७.९७ उमरगा १५९४४ २१८२ १३.६९ वाशी ११२७४ १०२७ ०९.११ लोहारा ५४६८ १५०० २७.४३ एकूण १,६२,५० ५०२४० ३०.९२

पावसाने उघडीप दिल्यानंतर रब्बी ज्वारीची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली. बहरलेल्या शिवारात कोळपणी करताना बळीराजा दिसत आहे. तुळजापूर तालुक्यात सर्वाधिक ज्वारीची पेरणी झालेली आहे. त्यानंतर धाराशिव तालुक्यात झाली आहे. तर भूम तालुक्यात सर्वात कमी पेरणी झाली.

# इराकवासीय चाखणार येरमाळ्याच्या केळीची गोडी



कळंब (प्रतिनिधी)-तालुक्यातील येरमाळा येथील शेतकऱ्याच्या बागेतील केळीची निर्यात इराकला होत आहे. निर्यातक्षम गुणवत्तापूर्ण केळीला मागणी वाढली. तालुक्यातील अनेक शेतकरी हे प्रयोगशील पध्दतीने शेती करून भरीव उत्पन्न घेत आहेत. याला कृषी विभागाचे सहकार्य मिळत आहे. केळीसारख्या नगदी पिकाकडेही वळत आहेत. कळंब तालुक्यातील येरमाळा येथील अमोल पाटील व कुटुंबीयांनी कळंब तालुक्याच्या जिरायती भागात निर्यातक्षम केळी लागवड प्रयोग यशस्वी केला. त्यांनी वर्षी ऑक्टोबर महिन्यात अडीच एकर लागवड केली होती. अकरा महिन्यांत त्यांची केळी काढण्यासाठी आली. यातून त्यांनी शेतकऱ्यांना शेतीची वेगळी वाट दाखवली आहे. त्यांच्या शेतातील केळीची आता इराक देशात निर्यात सुरू झाली आहे. विशेष म्हणजे २४ महिन्यांत केळी पिकांची दोन उत्पादने घेणे शक्य असल्याने ऊस शेतीच्या तुलनेने केळीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत चालला आहे. पाटील कुटुंबीयांचा अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिशा देणारा प्रयोग केला आहे. केळीची गुणवत्ता पाहून व्यापाऱ्यांनी मागणी केली. कळंबची गुणवत्तापूर्ण केळीही गेली आहे इराकला... कळंब केळी येथून इराकला निर्यात झाली. कळंब तालुक्यात केळी क्षेत्र वाढत आहे. महामा गांधी रोजगार हमी योजनेतून अनुदान तत्वावर केळी लागवड सुरू आहे. केळी पिकासाठी पाणी आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याची सोय करण्यासाठी मागेल त्याला शेततळे योजना आहे. तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी केले आहे. सहायक कृषी अधिकारी तुफान खोत यांचे पण सहकार्य लाभले.

केळीमुळे जमिनीचा पोत सुधारतो, अधिक फायदा क्रॉप रोटेशन म्हणून केळी हा चांगला पर्याय पुढे येत आहे. केळी पीक घेतल्यानंतर जमिनीचा पोत चांगल्या पद्धतीने सुधारतो. परिणामी, त्यामध्ये घेतलेल्या उत्सपिकाचे उत्पत्र चांगले येत आहे. दिवसेंदिवस केळीचे क्षेत्र वाढत आहे. पाणी व्यवस्थापन केल्यास जिरायती भागात देखील केळीसारखे नगदी पीक लागवड करणे शक्य असल्याचे शेतकरी पाटील सांगतात.

# मोटरसायकलची चोरी : गुन्हा दाखल

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -चंद्रकांत तात्यासाहेब जाधव, वय ३३ वर्षे, रा.देवसिंगा तुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ३५,००० किंमतीची टिव्हीएस मोटरसायकल क्र एमएच २५ एक्यु १११४ ही दि.०१.११.२०२५ रोजी ०७.०० वा. सु. १९.३० वा. सु. देवसिंगा तुळ पाटी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-चंद्रकांत जाधव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# वाशीमध्ये ब्रेक फेल बसने २ दुचाकीला ठोकरले, २ दुचाकींना चिरडले, चौघे जखमी



वाशी (प्रतिनिधी)-सोमवारी सकाळी साडेअकराची वेळ... वाशीमधील गर्दीने गजबजलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उताराचे ठिकाण... तेथेच ब्रेक फेल झालेल्या एसटी बसने दोन दुचाकी ठोकरले... दुचाकीवर पाठीमागे बसलेली महिला रस्त्यावर पडली... बसच्या पुढील दोन चाकांच्या मधोमध पडलेली महिला बाजूच्या युवकाच्या सांगण्यावरून न हलता तशीच पडून राहिली... बस थोडी पुढे गेल्यानंतर मागील चाकाच्या मध्ये असलेला ॲक्सल घासण्याची शक्यता होती... तेव्हा एका बाजूस सरकण्यास युवकाने सांगितले... महिला स्तब्ध राहिल्याने बस वरून जाऊनही महिलेला कसलीही इजा झाली नाही... मात्र दुचाकीवरून सिमेंटच्या रस्त्यावर पडल्याने हाताला मार लागल्याने महिला जखमी झाली. दैव बलवत्तर म्हणूनच सुशीला खांडेकर या सुखरूप बचावल्या. सोमवारी झालेल्या या अपघातात दोन दुचाकीवरील चौघे जण जखमी झाले. सुशीला यांच्यासह दुसऱ्या दुचाकीवरील शिंदे दाम्पत्य व त्यांचा दोन वर्षाचा मुलगा जखमी झाला.

वाशीमध्ये सोमवारी (दि. १७) भूम मार्गावरून कळंब आगाराची बस (एमएच १४, बीटी १४३५) पिंपळगाव (लिंगी) मार्गे वाशी फेरीसाठी सकाळी ११.१५ वाजता शहरात आली. सदरील बस भूम रस्त्यावरून शहराबाहेर असलेल्या बसस्थानकडे जात असताना अन्नपूर्णा मंगल कार्यालय परिसरात प्रवासी उतरून शहरात येत होती. या वेळी येऊन पर्यायी मार्गाने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून बसस्थानकात येत असताना ज्या ठिकाणाहून चौकातून वळण घ्यायचे आहे.

त्या ठिकाणी असलेल्या उतारावर गाडीच्या ब्रेकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने अपघात झाला. गाडीचे ब्रेक लागत नसल्याचे चालक एम. पी. राऊत यांच्या लक्षात आल्याने त्यांनी गाडी रेस करत ब्रेक मारण्याचा प्रयत्न केला. दोन दुचाकींना ठोकरून पुढे दवाखान्यासमोर उभा केलेल्या दोन दुचाकी चक्काचूर झाल्या. दवाखान्याच्या पुढील कठड्याला उटी लागल्याने बस थांबली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. सुशीला खांडेकर यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर शिंदे दाम्पत्यावर वाशी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू होते. वाशी तालुका निर्मिती होऊनही हक्काचे आगार नसल्याने संपूर्ण तालुक्याचा भार हा शेजारील कळंब व भूम आगारावर आहे. ज्यामुळे त्यांच्याकडून तालुक्यातील दळण वळणासाठी नेहमी दुय्यम दर्जाच्या बस पाठवण्यात येतात. याबाबत 'दिव्य मराठी'ने वृत्त प्रकाशित केले आहे. याबाबत कळंब आगाराचे आगारप्रमुखांनी तेव्हा आमच्याकडे नादुरुस्त बसच नाहीत, फोटो पाठवा असे उत्तर देऊन जबाबदारी झटकली होती. आज त्याच आगाराच्या बसचे ब्रेक फेल होऊन अपघात झाला. सुदैवाने आणि चालकाच्या प्रसंगवाधानांमुळे जीवितहानी टळली. मात्र नादुरुस्त बसबाबत आता तरी जाग येणार का? सूरज सोनवणे, महाविद्यालयीन विद्यार्थी अनिल गवारे.. (खासगी चालक)

### दुय्यम दर्जाच्या नादुरुस्त गाड्यांना वाशी फेरी

पत्नी सुखरूप पाहून परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत... नशीब चांगले,परमेश्वर धावला,म्हणून या संकटातून जिवंत सुखरूप बाहेर पडलोत. मी बाजूला पडून गाडीखाली पत्नी गेल्याचे डोळ्याने बघून क्षण भर सगळा अंधार दिसला. गाडी पुढे गेल्यावर लोकांनी आधार देऊन उठवल्यानंतर परमेश्वराचे आभार व्यक्त केले. सोमनाथ खांडेकर, सुशीला यांचे पती

एअर ब्रेक बस आहे. गाडीला असलेल्या एयर सिलिंडरमध्ये आठ बार एवढी हवा आवश्यक असते. सिलिंडरमधील हवा ही वारंवार ब्रेक लावल्याने कमी होत असते. बस आलेला रस्त्याचे काम अपूर्ण व खड्डे यामुळे वारंवार मारलेले ब्रेक, वाहतुकीला नसलेले शिस्त त्यामुळे सिलिंडरमधील हवा कमी होऊन ऐन चौकात ब्रेक फेल झाल्याने हा अपघात घडला असेल. हवा साठवण्याची जुन्या गाड्यांची क्षमताही याला कारण असू शकते.

# सौर उर्जा प्रकल्पाचे एमसीआर पॉइंटवर कॉपर केबल वायरची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.११.११.२०२५ रोजी डिघोळ फाटा निपाणी येथील २ सोलार पावर प्रा. ल. कंपनीचे सौर उर्जा प्रकल्पाचे एमसीआर पॉइंटवर कॉपर केबल वायर १,५५६मिटर,फिमेल केबल ३० नग,मेल केबल कॉपरचे ३० नग फेरुल चे १२० नग असा एकुण ८७,६२४ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या संतोष रघुनाथ नागरगोजे, वय ४० वर्षे, रा. येवलवाडी ता. पाटोदा जि. बीड यांनी दि.१७.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# १,९९,१०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१७ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २५४ कारवाया करुन १,९९,१०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649